राम प्रहर
बुधवार, २२ जून २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३३५
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## योगसाधना म्हणजे आर्ट ऑफ लाईफ -पंतप्रधान मोदी



**म्हैसूर :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि. २१) आंतरराष्ट्रीय योग दिन कर्नाटकमध्ये उत्साहात साजरा केला. त्यांनी म्हैसूर येथील एका कार्यक्रमात सहभाग नोंदविला. त्यांच्यासमवेत १५ हजार जणांनी योगसाधना केली. या वेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज योगामुळे मानवाला निरोगी जीवन जगण्याचा विश्वास मिळत आहे. योगाने जगात शांतीचाही प्रसार केला आहे. योग करण्याचे महत्त्व हे जगातील प्रत्येक कानाकोपऱ्यात पोहचले आहे. योग म्हणजे केवळ पार्ट ऑफ लाईफ नसून आर्ट ऑफ लाईफ आहे. यंदा आंतरराष्ट्रीय योग दिनाची थीम योगा फॉर ह्युमॅनिटी अर्थात मानवतेसाठी योगसाधना अशी होती. या थीमद्वारे योगाचा हा संदेश संपूर्ण मानवजातीपर्यंत पोहचवल्याबद्दल पंतप्रधानांनी संयुक्त राष्ट्रांसह सर्व देशांचे आभार मानले.

## अंतरंग

पनवेल स्टेशनमधील पुलाची डागडुजी करण्याची मागणी/२
नेरळमधील पथदिवे बंद; रस्त्यावर अंधाराचे साम्राज्य/७
आजपासून रंगणार रणजी ट्रॉफी फायनल/८

# महाराष्ट्रात राजकीय भूकंप

## शिवसेना नेते एकनाथ शिंदेंसह समर्थक आमदारांचे बंड

मुंबई : प्रतिनिधी

**राज्य विधान परिषद निवडणुकीच्या निकालानंतर महाराष्ट्रात राजकीय भूकंप झाला आहे. ठाकरे सरकारमधील मंत्री आणि शिवसेनेचे दुसरे सर्वांत महत्त्वाचे नेते एकनाथ शिंदे यांनी नेतृत्वाविरोधात बंड केले आहे. शिंदे आणि त्यांचे समर्थक आमदार गुजरातच्या सुरत येथे एका हॉटेलमध्ये गेले असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे राज्यातील ठाकरे सरकार अडचणीत आल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.**

विधान परिषदेच्या निवडणूक निकालानंतर शिवसेना नेते एकनाथ शिंदे पक्षाच्या संपर्कात नाहीयेत. २०१९मध्ये मुख्यमंत्रिपदावरून शिवसेना आणि भाजप युतीमध्ये मतभेद झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या मध्यस्थीने शिवसेनेने काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या सोबत महाविकास आघाडी सरकारची स्थापना केली, मात्र तेव्हापासूनच या सरकारमधील घटक पक्षांमध्ये वेळोवेळी असमन्वय दिसून आला आहे. आता शिवसेनेत फूट पडली आहे.

एकनाथ शिंदेंसोबत सुमारे ३५ आमदार असल्याचा दावा केला जात आहे. शिंदे हे मागील बऱ्याच काळापासून पक्षनेतृत्वावर नाराज असल्याची चर्चा होती. त्यांनी बंड करणे हा शिवसेनेला मोठा धक्का मानला जात आहे.

दरम्यान, शिवसेनेचे मिलिंद नार्वेकर आणि रवींद्र फाटक यांनी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचा निरोप घेऊन सुरतमध्ये एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. तब्बल तासभर ही बैठक चालली. या बैठकीत शिंदे यांनी काही अटी ठेवल्याची माहिती मिळतेय. शिवसेनेने काँग्रेस, राष्ट्रवादीशी आघाडी तोडून भाजपशी युती करावी तसेच भाजपसोबत शिवसेनेने सरकार स्थापन करण्याची मागणी शिंदे यांनी केली असल्याचे सूत्रांकडून समजते. त्यामुळे उद्धव ठाकरे यावर काय निर्णय घेणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आणखी काही आमदार शिंदे गटात जाणार?

**मुंबई** : एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर आणखी चार ते पाच आमदार हे शिंदे यांच्यासोबत जाणार असल्याची माहिती मिळत आहे. हे आमदार नेमके कोण आहेत हे अद्याप पुढे आलेले नाही, परंतु शिंदे यांच्यासोबत हॉटेलमध्ये ३५ आमदार असल्याची माहिती आहे. त्यात आणखी चार ते पाच आमदार आल्यास ही संख्या ४०पर्यंत जाऊ शकते. शिवसेनेतील मोठे नेते मानले जाणारे शिंदे हे गेल्या काही दिवसांपासून नाराज असल्याची चर्चा होती, पण पक्षनेतृत्वाने त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न झाला नाही. त्यामुळे अखेर त्यांनी बंडाचे हत्यार उपसले असून शिवसेनेसाठी ही धोक्याची घंटा मानली जात आहे.





### हा शिवसेनेचा अंतर्गत विषय : खा. शरद पवार



**नवी दिल्ली** : राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पत्रकार परिषद घेत सध्याच्या घडामोडींवर भाष्य केले. शिवसेना नेते एकनाथ शिंदेंसह सहकारी आमदारांच्या बंडावर बोलताना खासदार पवार यांनी हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय आहे. माझी कोणाशीही बातचीत झालेली नाही. शिंदे किंवा इतर आमदार कुठे थांबले आहेत हेदेखील मला माहीत नाही, असे म्हटले. सरकार पडले, तर आम्ही विरोधात बसू शकतो, अशी भूमिकाही पवारांनी या वेळी मांडली.

### 'उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा'



**मुंबई** : शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीला जबरदस्त दणका दिला आहे. हे सरकार अल्पमतात आल्यामुळे आता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा. त्यांना सत्तेवर राहण्याचा अधिकार राहिलेला नाही, अशी प्रतिक्रिया रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केली आहे. शिवसेनेने भाजपसोबत युती करावी, अशी एकनाथ शिंदे आणि अनेक शिवसेना आमदारांची इच्छा होती, मात्र संजय राऊत आणि उद्धव ठाकरे यांनी काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत युतीचा निर्णय घेतला. त्यातून शिंदे व अन्य शिवसेना आमदारांची नाराजी वाढत गेली, असे सांगून आघाडीचे सरकार लवकरच कोसळेल, असेही ना. आठवले म्हणाले.

### रायगडातील शिवसेना आमदारही 'नॉट रिचेबल'

**अलिबाग** : महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री आणि शिवसेना नेते एकनाथ शिंदे हे समर्थक आमदारांना घेऊन गुजरातमध्ये गेले आहेत. ना. शिंदे यांच्यासोबत असलेल्या आमदारांमध्ये रायगड जिल्ह्यातील शिवसेनेच्या तिन्ही आमदारांचा समावेश आहे.





महाडचे आमदार भरत गोगावले, अलिबागचे आमदार महेंद्र दळवी आणि कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे संपर्काबाहेर आहेत. शिवसेनेकडून वारंवार त्यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जातोय, मात्र त्यांचा फोन लागत नाही. या तिन्ही आमदारांनी वारंवार राष्ट्रवादीविरोधातील आपली नाराजी जाहीर केली होती. रायगड जिल्ह्यात राष्ट्रवादीचा पालकमंत्री असल्याने त्यांनी विरोध करीत तिथे पक्षाचा पालकमंत्री द्यावा, अशी मागणी अनेकदा केली होती, मात्र मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. हीच नाराजी ते एकनाथ शिंदेंसोबत जाण्यासाठी कारणीभूत ठरली असल्याचे बोलले जात आहे.

कोणीही चालेल, पण रायगडला शिवसेनेचा पालकमंत्री द्या, अशी शिवसेना आमदारांची मागणी होती, पण मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या मागणीची दखल घेतली नव्हती. अखेर त्याचा उद्रेक झाल्याची चर्चा आहे.

## निवडक

### राष्ट्रपती निवडणूक : यशवंत सिन्हा विरोधी पक्षाचे उमेदवार

**नवी दिल्ली** : येत्या १८ जुलै रोजी होणाऱ्या राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीसाठी यशवंत सिन्हा यांना विरोधी पक्षांकडून उमेदवारी देण्यात आली आहे. विरोधी पक्षांच्या मंगळवारी (दि. २१) झालेल्या बैठकीत सिन्हा यांच्या नावाची घोषणा करण्यात आल्याची माहिती काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी दिली. दरम्यान, सत्ताधारी भाजपकडे असलेले संख्याबळ पाहता या निवडणुकीतही विरोधकांचा निभाव लागणे कठीण आहे.

### मंत्री अनिल परब यांची ईडीकडून कसून चौकशी

**मुंबई :** महाविकास आघाडी सरकारमधील मंत्री आणि शिवसेना नेते अनिल परब यांची मंगळवारी (दि. २१) सक्तवसुली संचालनालयाकडून चौकशी करण्यात आली. दापोली येथील रिसॉर्टच्या जमीन खरेदीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप परब यांच्यावर आहे. यापूर्वी या प्रकरणी सात ठिकाणी ईडीने छापे टाकून शोधमोहीम राबविली होती.

## अग्निपथ योजना मागे घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही -डोवाल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



केंद्र सरकारने सैन्यभरतीसाठी जाहीर केलेल्या अग्निपथ योजनेवरून देशाचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी स्पष्ट मत मांडले आहे. अग्निपथ योजना मागे घेतली जाणार नसल्याचे डोवाल यांनी मुलाखतीत सांगितले आहे. ही योजना मागे घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे ते म्हणाले.

कृषी कायद्यांप्रमाणे अग्निपथ योजना मागे घेतली जाण्याची शक्यता फेटाळून लावताना राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी सांगितले की, मागे घेण्यासाठी हा निर्णय घेण्यात आलेला नाही. या योजनेवर अनेक दशके चर्चा झाली आहे. डोवाल यांनी या वेळी अनेक लष्करी समित्या आणि मंत्री पॅनेलचा उल्लेख केला, ज्यांनी सशस्त्र दलांसाठी अशा प्रकारच्या भरती योजनेवर चर्चा केली होती.

डोवाल यांनी मुलाखतीदरम्यान नवी यंत्रणा तरुण आणि तंत्रज्ञानाशी जुळवून घेणारी असण्यासाठी प्रयत्न असेल यावर भर दिला. सर्वाधिक तरुण लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये भारत असतानाही लष्कर भरतीसाठी जास्त वयोमर्यादा ठेवली जाऊ शकत नाही, असे त्यांनी सांगितले.

### 'अग्निवीरांच्या भरतीत बदल होणार नाही'

**नवी दिल्ली** : लष्करासाठी देश प्रथम असून अग्निवीरांच्या भरतीत कोणताही बदल होणार नाही, असे स्पष्ट मत लेफ्टनंट जनरल अनिल पुरी यांनी व्यक्त केले आहे. ते मंगळवारी (दि. २१) पत्रकार परिषदेत बोलत होते.

देशासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या अग्निपथ लष्करी भरती योजनेबद्दल विरोधकांकडून तरुणांची दिशाभूल करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर लष्कराकडून पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट करण्यात आली. हा देशभक्तीचा विषय आहे. त्यामुळे युवकांनी ही संधी हातातून जाऊ देऊ नये, असेही लेफ्टनंट जनरल पुरी या वेळी म्हणाले.

## खारघरमधील मच्छीमार्केटच्या नव्या जागेची सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून पाहणी

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर सेक्टर २० येथील भरवस्तीत असलेले मच्छीमार्केट नागरिकांना होणाऱ्या त्रासानंतर सेक्टर १४ येथील राखीव भूखंडावर स्थलांतरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या जागेची सोमवारी (दि. २०) पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पाहणी केली.



गेले काही वर्षे खारघर सेक्टर २० येथील भरवस्तीत असलेल्या मच्छीबाजाराच्या संदर्भात आजूबाजूच्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांकडून अनेक तक्रारी खारघर येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयात येत होत्या. त्या अनुषंगाने भाजप नगरसेवक तथा पदाधिकाऱ्यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना निवेदने दिली होती. येथे मोठ्या प्रमाणात मासे व मटणाचा कचरा कुजल्याने नेहमीच घाण व दुर्गंधी पसरत असते. आजूबाजूच्या रहिवाशांना तेथून इमारतीत ये-जा करताना प्रचंड प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. ही बाब अनेकदा सिडको अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणूनही चालढकल करण्यात येत होती.

दैनंदिन मार्केट सिडकोकडून पनवेल महापालिकेला हस्तांतरित होताच भाजपतर्फे हे मार्केट इतर ठिकाणी स्थलांतरित करण्यासाठी पाठपुरावा करण्यात आला. सभागृह नेते परेश ठाकूर आणि आयुक्त गणेश देशमुख यांनी नागरिकांना होणाऱ्या त्रासाची दखल घेत भरवस्तीत असलेले हे मच्छीमार्केट सेक्टर १४ येथील राखीव असलेल्या भूखंडावर स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतला आहे.

या संदर्भातील पाहणी दौरा सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सोमवारी केला. त्यांनी पाहणी दौऱ्यात याबाबतच्या योग्य त्या सूचना महापालिकेचे प्रमुख अभियंते श्री. कटेकर तसेच त्यांच्या सहकाऱ्यांना दिल्या.

या वेळी भाजप खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, महापालिका स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर, नगरसेवक अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, रामजी बेरा, युवा नेते समीर कदम, वार्ड अध्यक्ष वासुदेव पाटील यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## माची प्रबळगड येथे योग दिन साजरा

### आमदार प्रशांत ठाकूर यांची लाभली प्रमुख उपस्थिती



**योगसाधनेने अनेक दुर्धर आजार बरे होतात. त्यामुळे योगाचे आरोग्याच्या दृष्टिकोनातून आपल्या जीवनात खूप महत्त्व आहे. शरीरातील प्रत्येक अवयव तंदुरुस्त राखण्यासाठी व त्याची सेवा दीर्घायुष्यापर्यंत घेता यावी यासाठी योगासनांची मदत होऊ शकते. त्यामुळे स्वत:ला दीर्घकाळ निरोगी ठेवण्यासाठी आपल्या पुढील आयुष्यामध्ये योगासनांचा अभ्यास सर्वांनी करावा.**
**-आमदार प्रशांत ठाकूर,**
**अध्यक्ष, उत्तर रायगड जिल्हा, भाजप**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त माची प्रबळगड येथे भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी मंगळवारी (दि. २१) योगसाधना केली. या वेळी पनवेलच्या आरोग्य सेवा समितीचे योग केंद्र प्रमुख सूर्यकांत फडके, सहशिक्षक अरविंद गोडबोले यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक हरेश केणी, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष पाटील, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, शहराध्यक्ष रोहित जगताप, बेलवलीच्या सरपंच संगीता भुतांबरा, सतीश पाटील, सदस्य दिनेश पाटील, अमिता पवार, हेमंत तांडेल, रोहन घरत, चिन्मय समेळ, अभिषेक भोपी, विशाल पवार, आशिष कडू, मयूर कदम, पवन भोईर, साधना पाटील, यांच्यासह युवा व ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी योगसाधना केली.

दरवर्षी २१ जून आंतरराष्ट्रीय योग दिन रोजी साजरा केला जातो. हा दिवस पहिल्यांदा २१ जून २०१५ रोजी साजरा करण्यात आला, ज्याची सुरुवात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २७ सप्टेंबर २०१४ रोजी संयुक्त राष्ट्र (युनो) महासभेत केलेल्या भाषणात केली होती. योगसाधना केवळ शारीरिक तंदुरुस्ती आणत नाही, तर जास्तीत जास्त मानसिक शांती देते. त्यामुळे ताण-तणावही कमी होतो.

## वीज पडून तीन शेतकऱ्यांचा मृत्यू

**नांदेड : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील भोकर तालुक्यात पाळज शिवारामध्ये मंगळवारी (दि. २१) सायंकाळी वीज पडून तीन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. हे शेतकरी शेतात पेरणीची तयारी करीत होते.

साईनाथ सातमवार (वय ३०), राजेश्वर चटलावार (४०) व बोजना रामनवार (३२) अशी मृत शेतकऱ्यांची नावे आहेत. ते शेतामध्ये पेरणी करीत असताना सायंकाळच्या सुमारास ढगांचा गडगडाट सुरू झाला आणि सोबतच वीज कोसळली. ही वीज अंगावर पडल्याने तिन्ही शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, या घटनेनंतर उपविभागीय अधिकारी डॉ. राजेंद्र खंदारे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्याचे आदेश दिले.

## 'पराभवाची जबाबदारी स्वीकारून नाना पटोलेंनी राजीनामा द्यावा'

**नागपूर : प्रतिनिधी**



विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचे प्रथम क्रमांकाचे उमदेवार चंद्रकांत हंडोरे यांच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी माजी आमदार व काँग्रेस नेते डॉ. आशिष देशमुख यांनी केली आहे.

विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचे पहिल्या क्रमांकाचे उमेदवार चंद्रकांत हंडोरे यांचा पराभव झाला. काँग्रेसची मते फुटली. ही खेदाची बाब आहे. हंडोरे हे दलित समाजाचे आहेत. त्यांना निवडून आणणे अपेक्षित होते. त्यांच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून पटोले यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा व मतफुटीची पक्षपातळीवर चौकशी करावी, अशी मागणी करणारे पत्र काँग्रेस पक्षश्रेष्ठींना पाठवणार असल्याचेही देशमुख म्हणाले.

२०१९मधील लोकसभा निवडणुकीच्या पराभवाची जबाबदारी स्वीकारून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पक्षाध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यापूर्वी १९९८मध्ये राज्यसभेच्या निवडणुकीत काँग्रेस उमेदवार राम प्रधान पराभूत झाले होते. त्या वेळी तत्कालीन प्रदेशाध्यक्ष रणजीत देशमुख यांनी पद सोडले होते, याकडे देशमुख यांनी लक्ष वेधले.

# एकनाथ शिंदे यांच्याबाबत भाजपचे ‘वेट अँड वॉच’

## प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते व राज्याचे नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वीकारलेल्या भूमिकेमागे भारतीय जनता पक्षाचे कोणतेही नियोजन नाही. एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीच्या स्थैर्याबाबत भाजपचे सध्या ‘वेट अँड वॉच’ असे धोरण आहे, असे प्रतिपादन भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी (दि. २१) केले. ते मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

या वेळी प्रदेश उपाध्यक्ष माधव भांडारी, सुनील कर्जतकर, राज पुरोहित, कृपाशंकरसिंह, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, उत्तर भारतीय मोर्चाचे संयोजक संजय पांडे व प्रवक्ते अतुल शाह उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, एकनाथ शिंदे यांच्या भूमिकेबाबत आताच मत व्यक्त करणे घाईचे ठरेल. ते शिवसेनेचे विधिमंडळातील गटनेते आहेत. त्यांची भूमिका व त्यातून निर्माण झालेली परिस्थिती ही त्या पक्षाचा अंतर्गत बाब आहे. भाजपने शिंदे यांना सत्तास्थापनेचा कोणताही प्रस्ताव दिलेला नाही किंवा त्यांच्याकडूनही कोणताही प्रस्ताव आलेला नाही.

ते म्हणाले की, २०१९च्या विधानसभा निवडणुकीनंतर शिवसेनेने भाजपसोबतची युती तोडून काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसशी हातमिळवणी केली व महाविकास आघाडीमार्फत सत्ता मिळवली, पण ही अनैसर्गिक युती असल्याने त्यामध्ये शिवसेनेच्या खासदार व आमदारांची घुसमट होत आहे. आगामी निवडणूक आपण भाजपसोबत युतीशिवाय जिंकू शकत नाही, असे अनेकांना वाटते. त्यातून पक्षाच्या नेत्यांची खदखद बाहेर पडणे स्वाभाविक आहे.



### विराधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन

विधान परिषद निवडणुकीसह राज्यसभा निवडणुकीतही भाजपचे सर्व उमेदवार विजयी झाले. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या कुशल रणनितीमुळे भाजपला विजय मिळाला. त्यांच्या यशस्वी नेतृत्वाचा राज्याला पुन्हा एकदा अनुभव आला. आपण प्रदेश भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करतो. भाजपला या निवडणुकांमध्ये ११२ या संख्याबळापेक्षा कितीतरी अधिक म्हणजे १३४ मते मिळाली, असे चंद्रकांत पाटील म्हणाले.

# नवी मुंबईतील टंचाईवरून आमदार गणेश नाईक आक्रमक



**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि. २१) नवी मुंबईतील विविध प्रलंबित प्रश्नांवर नियमित बैठक झाली. बैठकीत भाजप आमदार गणेश नाईक यांनी आक्रमक भूमिका घेत शहरात सध्या सर्वत्र सुरू असलेल्या पाणीटंचाईवर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. त्याचबरोबर अद्यापही अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम मिळालेली नाही, याकडे आयुक्तांचे लक्ष वेधून प्रलंबित शिष्यवृत्तीचे वाटप लवकरात लवकर करण्याची सूचनादेखील केली.

आमदार नाईक म्हणाले, नवी मुंबईतील अनेक भागात पाणीपुरवठ्याची समस्या गंभीर बनली आहे. अनेक भागात दूषित पाणी पाणी पुरवठा होतो आहे. एमआयडीसीकडून मिळणारे ४० एमएलडी पाणी इतर शहरांमध्ये वळवले जात असून त्यामुळे नवी मुंबईत पाणीटंचाई सुरू आहे. नवी मुंबईच्या हक्काचे पाणी आणि नवी मुंबईला मिळेल हे सुनिश्चित करून आयुक्तांनी पाणीटंचाईग्रस्त भागात पाण्याचा दाब वाढवावा, अशी सूचना केली.

कोपरखैरणे विभागातील सुमारे एक हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज विविध कारणे सांगून अपात्र ठरविण्यात आले आहेत. तातडीने कार्यवाही करण्याची सूचना करून रद्द करण्यात आलेले अर्ज पुन्हा तपासावेत, कोणावरही अन्याय करू नये, असे आमदार नाईक यांनी सुचवले. बेलापूर येथील होल्डिंग पाँड सफाईचे अनुषंगाने काम सुरू झाले आहे. नवी मुंबई ऐरोली ते बेलापूर यादरम्यान एकूण सात होल्डिंग पाँड असून तेदेखील साफ करण्याची आवश्यकता माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत यांनी व्यक्त केली.

शहरातील भुयारी मार्गांमध्ये प्रखर प्रकाशाचे एलईडी दिवे भुयारी मार्गांमध्ये बसवावे, ऐरोली नाका– चिंचपाडा भुयारी मार्गाच्या कामातील अडथळे दूर करून तो लवकरात लवकर बांधावा, अशी मागणी आमदार नाईक यांनी केली.

या वेळी नवी मुंबई परिवहन सेवेचे कर्मचारी नवी मुंबईकरांना उत्तम प्रवासी सेवा देत आहेत. परिवहन सेवेच्या कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न श्रमिक सेनेचे अध्यक्ष तथा माजी खासदार संजीव नाईक यांनी आयुक्तांकडे मांडले आहेत, त्याचा पाठपुरावा सुरू आहे. या अनुषंगाने परिवहनचे महाव्यवस्थापक आणि श्रमिक सेनेसोबत लवकरच एक बैठक घेणार आहेत, असे आयुक्तांनी सांगितले.

बैठकीसाठी ऐरोलीचे माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, माजी महापौर सुधाकर सोनावणे, माजी सभागृहनेते रवींद्र इथापे, माजी स्थायी समिती सभापती अनंत सुतार, माजी विरोधी पक्षनेते दशरथ भगत अन्य नगरसेवक आणि पदाधिकारी उपस्थित होते.

### वाढत्या कोरोना रुग्णसंख्येबाबत उपाययोजना कराव्यात

नवी मुंबईमध्ये मागील काही दिवसात कोरोना रुग्णांची संख्या वाढत आहे. या पार्श्वभूमीवर वेळीच कोरोना टेस्टिंग आणि कोरोना लसीकरणाची संख्या वाढवावी. कोरोना सेंटर आणि रुग्णालयांमधून आवश्यक औषधे वैद्यकीय आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची तरतूद करावी, अशी मागणी आमदार गणेश नाईक यांनी केली.

### आदिवासी समित्यांवर सक्रीय कार्यकर्त्यांची निवड होणार

महापालिकेने स्थापन केलेल्या आदिवासी समित्यांवर जे कार्यकर्ते आदिवासींसाठी खऱ्या अर्थाने काम करीत आहेत, त्यांचीच निवड करण्याची सूचना आमदार नाईक यांनी केली असता ती आयुक्त बांगर यांनी मान्य केली.

# उरण महाविद्यालयात योग दिन उत्साहात

**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा झाला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी, योगा ही एक दिवस करण्याची प्रक्रिया नसून दररोज योगा केला पाहिजे, असे सांगितले.

प्रमुख मार्गदर्शक योगा प्रशिक्षक पूनम चव्हाण यांनी, योगा ही जीवन जगण्याची कला असून नियमित योगाभ्यास केला तर आपण दुःखमुक्त व निरोगी होतो असे सांगितले तसेच प्राणायामाचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांना शिकवले. ज्येष्ठ प्रा.के.ए.शामा यांनी, योगामुळे जीवन आनंदी आणि प्रसन्न होईल त्यासाठी योगाभ्यास करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. एम. जी. लोने यांनी केले. सूत्रसंचालन एन. एस. एस. प्रमुख प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. एच. के. जगताप यांनी व्यक्त केले.



# पालखी सोहळ्यानिमित्त आज पुण्यातील रस्ते वाहतुकीत बदल

**पुणे : प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे आगमन बुधवारी (२२ जून) शहरात होणार असून पालखी आगमन, मुक्काम, प्रस्थानानिमित्त शहरातील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात येणार आहे.

वाहनचालकांना पालखी मार्गाची माहिती व्हावी, यासाठी diversion.punepolice.gov.in हे संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे, तसेच पालखीसाठी चार हजार पोलिसांचा बंदोबस्त राहणार आहे. ड्रोन कॅमेऱ्यांचाही वापर करण्यात येणार आहे.

**श्री संत तुकाराम महाराज पालखी आगमनानिमित्त बंद रस्ते** : बोपोडी चौक ते खडकी बाजार, पोल्ट्री चौक, जुना मुंबई–पुणे रस्ता, आरटीओ चौक ते अभियांत्रिकी महाविद्यालय चौक, येरवडा सादलबाबा दर्गा ते पाटील इस्टेट चौक (संगमवाडी पूल).

### वाहतुकीस बंद राहणारे प्रमुख रस्ते

रेंजहिल चौक ते संचेती चौक ते गणेशखिंड रस्ता बुधवारी दुपारनंतर वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे. डेक्कन जिमखाना खंडोजीबाबा चौक ते वीर चापेकर चौक (फर्ग्युसन रस्ता) बंद ठेवण्यात येणार आहे. शनिवार वाडा गाडगीळ पुतळा ते स. गो. बर्वे चौक (मॉडर्न कॅफे) रस्ता बंद राहणार आहे. मॉडर्न महाविद्यालय रस्ता वाहतुकीस बंद ठेवण्यात येणार आहे.

**श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी आगमनानिमित्त बंद रस्ते** : आळंदी रस्ता, कळसफाटा ते बोपखेल फाटा, येरवडा मनोरुग्णालय, सादलबाबा दर्गा ते पाटील इस्टेट.

# पनवेल महापालिकेतर्फे योग दिन उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या वतीने ज्येष्ठ नागरिक हॉलमध्ये योग दिन साजरा करण्यात आला. आर्ट ऑफ लिव्हिंगच्या प्रशिक्षकांनी या वेळी महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योगासनाचे विविध प्रकार आणि प्राणायमसाठी मार्गदर्शन केले.

या वेळी सहाय्यक संचालक नगररचनाकार ज्योती कवाडे, उपायुक्त विठ्ठल डाके, सचिन पवार, गणेश शेटे, कैलास गावडे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, आरसीएच अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, प्रभाग अधिकारी अमर पाटील, सदाशिव कवठे, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

आर्ट ऑफ लिव्हिंगच्या प्रदीप पाटील, रूपाली ठोमसे, संदंश मंडलिक, शंभू मठ यांनी भुंजगासन, ताडासन, धनुरासन, सर्वांगासन, शवासन असे योगासनांचे विविध प्रकार शिकवले, तसेच त्याचे शरीराला होणारे फायदे सांगितले. याचबरोबरच प्राणायम, कपालभाती शिकवून ध्यान कसे करावे, त्यांचे फायदे सांगितले.

# आषाढी एकादशी निमित्त उरण ते पंढरपूर दिंडी

**उरण : प्रतिनिधी**

श्री संत ज्ञानेश्वर माऊली पायी दिंडी मंडळ नवीन शेवा उरण, ओम साई भक्त भजन मंडळ नवीन शेवा, श्री संत ज्ञानेश्वर माऊली महिला मंडळ नवीन शेवा, श्री संत ज्ञानेश्वर माऊली महिला मंडळ माळाकोळी नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी एकादशीनिमित्त उरणमधून श्री क्षेत्र पंढरपूरला दिंडी निघाली आहे.

मंगळवारी (दि. २१) उरणमधून पायी यात्रा दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले. दिंडीत हभप देवजी महाराज बाबर, गोविंद महाराज घरत, नितीन महाराज म्हात्रे, महेश महाराज साळुंखे, राजेंद्र महाराज ढाकणे, श्रीरंग महाराज तिडके, सरस्वती ताई केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रस्थान झाली आहे. ९ जुलै रोजी क्षेत्र पंढरपूर येथे दिंडी पोहचणार आहे. उरणमधून प्रथमच श्री क्षेत्र पंढरपूर येथे जाण्यासाठी पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष हभप राजेंद्र महाराज केंद्रे यांनी दिली. ज्यांना अन्नदान करायचे आहे किंवा आर्थिक मदत वस्तू स्वरूपात करावयाची आहे, त्यांनी राजेंद्र महाराज केंद्रे (८७७९५५६५११) अथवा मंडळातील कोणत्याही सदस्याकडे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



# उरण येथे योग दिनानिमित्त ठिकठिकाणी शिबिर



**उरण : वार्ताहर**


उरण येथे बीपीसीएल, ओएनजीसी, फुंडे कॉलेज, गेट वे टर्मिनल, अनमोल इंग्लिश स्कूल, सीआयएसएफ ओएनजीसी, प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, इंडियन नेव्ही आदी ठिकाणी योगदिन साजरा झाला. योगशिक्षक दिनेश घरत, प्राजक्ता सर्वया, निकिता पवार, पूनम चव्हाण, बी. के. डिम्पल आदींनी योगासने करून दाखविली.

# पनवेल रेल्वे पुलाची डागडुजी करण्याची मागणी

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल रेल्वे स्टेशनवरून नवीन पनवेलकडे जाण्यासाठी असलेल्या पुलावरील बसवण्यात आलेल्या लाद्या उखडल्यामुळे अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामध्ये गर्दीच्या वेळी पाय अडकून एखादा प्रवाशी पडण्याची शक्यता आहे. यामुळे या पुलाची डागडुजी करण्यात यावी, अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

मध्य रेल्वेचे पनवेल रेल्वे स्टेशन हे मोठे जंक्शन आहे. येथे क्रमांक १ ते ४ फलाटावर लोकल गाड्या तर क्रमांक ५ ते ७ वर लांब पल्ल्याच्या गाड्या येत असतात. फलाट क्रमांक ५ ते ७ हे नवीन पनवेल बाजूला आहेत. पनवेल शहराचा मोठ्या प्रमाणात विकास हा नवीन पनवेल बाजूला झाला आहे. या बाजूला मोठ्या प्रमाणात रहिवासी वसाहती, इंजिनियरिंग व इतर महाविद्यालये असल्याने प्रवाशांची विद्यार्थ्यांची जा–ये असते. याबाजूला जाण्यासाठी सहा फूट रुंदीचा पूल आहे. लोकल थांबल्यावर अनेक जण या पुलावर जाण्यासाठी फलाटावरून धावत जात असतात.



या पुलावरील जुन्या लाद्या कोरोना काळामध्ये काढून नवीन मोठ्या लाद्या बसवण्यास आल्या होत्या. नवीन पनवेलमध्ये जाण्यासाठी असलेल्या या एकमेव पुलावर बसवण्यात आलेल्या या लाद्या अनेक ठिकाणी निघाल्या असून तेथे खड्डे पडले आहेत. त्यामध्ये पाय अडकून अनेक जण पडत आहेत. याशिवाय नवीन पनवेल बाजूला या पुलावर पन्हाळी लावण्याची सल्लागार समितीच्या बैठकीत सतत मागणी होत आहे.

नवीन पनवेलकडे जाणाऱ्या एकमेव पुलावर मोठ्या प्रमाणात गर्दी होते. तेथे पावसाळ्यात पाणी पडल्याने चिकट होत आहे. त्यावरुन पाय घसरून प्रवासी पडत आहेत. त्यामुळे या पुलावर डागडुजी करण्याची मागणी होत आहे.

**रेल्वे पुलावर बाहेरून गाडी आली की, गर्दी होते. त्यातच लोकल पकडण्यासाठी घाईत जाताना खड्डे न दिसल्याने पाय अडकून पडायला होते. या खड्ड्यात पाय अडकून वाकडा होत असल्याने फ्रॅक्चर होण्याचाही धोका आहे. त्यामुळे हे खड्डे भरण्यात यावे, अशी आमची मागणी आहे.**
**–सुषमा महाजन, प्रवासी**

**रेल्वे पुलावरील खड्ड्यांमुळे पडून प्रवाशांना दुखापत होऊ शकते. म्हणून याबाबत सीनियर एडीईएन यांना पत्रे पाठवलेली आहेत. आजही त्यांना खड्ड्यांचे फोटो पाठवून पुन्हा आठवण करून दिली आहे.**
**–जगदीश प्रसाद मिना, स्टेशन मॅनेजर, पनवेल**

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २४

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. भारतात सध्या एलआयसीसह एकूण किती जीवन विमा कंपन्या आहेत?**

**अ.** २४ **आ.** २०
**इ.** १० **ई.** २६

**२. म्युच्युअल फंडाचे व्यवस्थापन भारतात सध्या किती कंपन्या करतात?**

**अ.** ४० **आ.** ४४
**इ.** २० **ई.** १०

**३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**

**अ.** एचडीएफसी बँक **आ.** आयसीआयसीआय बँक
**इ.** कोटक महिंद्रा बँक **ई.** स्टेट बँक ऑफ इंडिया

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

## सीकेटी विद्यालयात विद्यार्थ्यांनी केली योगसाधना; शिक्षकांनी दिले प्रोत्साहन






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयातील इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक विभागात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा झाला. या वेळी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी बालवयातच योगासनांची मुलांना सवय लागली तर त्यांचे जीवन सुदृढ आणि निरोगी बनेल, यात शंका नाही, असे प्रतिपादन केले.

सीकेटी विद्यालयात मंगळवारी (दि. २१) योग दिन उत्साहात झाला. या वेळी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी मुलांना योगदिनाचे महत्त्व विशद करुन योगासनांविषयी मार्गदर्शन केले. दरम्यान, सुरेंद्र ठमके, ठाकूर सर, बीना नायर, प्रिया नायर, लता बालसुब्रमनियन, शबुना शेट्टी, स्नेहल कडव यांच्यासह सर्व शिक्षकवृंदांनी शाळेच्या प्रांगणात योगासने करून दाखविली व विद्यार्थ्यांना आपल्या उत्तम आरोग्यासाठी रोज योगासने करण्याचे आवाहन केले.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दोन वर्षांच्या कोरोना काळानंतर मंगळवारी (दि. २१) जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील सीकेटी विद्यालयातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक विभागात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

शारिरिक शिक्षण विभागातील शिक्षक भरत जीतेकर, अशोक पाटील, प्रकाश रिसबुड यांनी इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांना योगासनांचे प्रशिक्षण दिले होते. २१ जून रोजी इन्स्टिट्यूट ऑफ योग आणि आयुर्वेद संस्थेचे प्रतिनिधी योग दिन साजरा करण्याकरिता विद्यालयात आले होते. योग इन्स्टिट्यूटतर्फे गीता गुप्ता यांनी भिमेश शिंदे आणि शिवानी भोईर यांच्या सहाय्याने योग प्रात्यक्षिके घेतली.



या वेळी विजय वेदपाठक आणि डी. बी. जोशी उपस्थित होते.

पर्यवेक्षिका निरजा अदुरी यांनी सांगितले की, योगासनांमुळे मन, शरीर आणि आत्मा यांचे स्वास्थ संतुलित राहते. म्हणूनच विद्यार्थ्यांनी योगासने केली पाहिजेत. या वर्षीची योगादिनाची थीम माणुसकीसाठी योग अशी असून मनामनात माणुसकीची जपणूक व्हावी हेच या योग दिनाचे उदिष्ट्य आहे. गेले दोन वर्षे आम्ही योग दिन ऑनलाइन साजरा केला होता, परंतु या वर्षी पुन्हा एकदा हा दिवस प्रत्यक्ष साजरा करताना विद्यार्थ्यांच्या चेहेऱ्यावर आनंद दिसत होता, असे या वेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी सांगितले.

## नवीन पनवेलमध्ये योग दिनानिमित्त कार्यक्रम; महापौरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील फिटनेस जिममध्ये मंगळवारी (दि. २१) आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी ७ ते ९ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी योगावर व्यायामाचे महत्त्व सांगितले.



रेशमी रांगपरीया यांनी उपस्थितांकडून योगा, प्राणायाम करून घेतले. फिटनेस पॉइंटचे संचालक व गार्डन हॉलीबॉलचे अध्यक्ष किसन पवार यांनी महापौर कविता चौतमल त्यांचे स्वागत केले. सेक्रेटरी श्री. घोंगडे यांनी योग गुरू रेशमी रंगपरीया त्यांचे स्वागत केले. तसेच बेटी बचाव बेटी पढावच्या उत्तर रायगड संयोगिता आरती तायडे यांचे सौ. मराठे यांनी स्वागत केले. श्री. राठोड याचा कार्यक्रम सफल करण्यात मोलाचा वाटा होता.

उतम खेळाडू म्हणून श्री. कांबळे यांचा महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. श्री. तारेकर, श्री. जाधव, स्वप्नील पवार, मारुती रोकडे, फिरोज, संजय सिंग, न्यानेस्वर ठाकूर, न्याणेस्वर जोशी (माहुली) कांबळे, माने, तारी, दिनेश, अजय, रमेश देशमुख, सिंग, कल्पेश, रितेश आणि पुरुष महिला उपस्थित होते.

## खारघरमध्ये योगाभ्यास

**खारघर :** शाश्वत फाऊंडेशनच्या सेक्टर १९ येथील सिडको उद्यानात संस्थेतर्फे योग दिवस साजरा करण्यात आला. योगदर्शन फांऊडेशनच्या संचालिका नीरू भट यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेच्या सदस्यांनी योग अभ्यास केला. ॐकार मंत्राचा उच्चारण करून वृक्षासन, सूक्ष्म व्यायाम, भुजंगासन, अनुलोम-विलोम, प्राणायण आदी योगासने ह्या सत्रात करण्यात आली.

संस्थेच्या अध्यक्ष बीना गोगरी यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून ह्या वर्षी योग दिनाची संकल्पना 'मानवतेसाठी योग' असल्याचे सांगितले. योगशिक्षिका नीरू भट यांनी योग व व्यायाम ह्यांचे रोजच्या जीवनातील महत्त्व यावर माहिती दिली. अन्जु पटेल यांनी प्रार्थना म्हणत कार्यक्रमाची सांगता केली.






**कामोठे :** रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज येथे योग दिन साजरा करण्यात आला.



**खारघर :** अटल फाउंडेशन आणि भारत स्वाभिमान न्यास यांच्यातर्फे योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सेक्टर १२ येथील वासुदेव बळवंत फडके उद्यानात झालेल्या या कार्यक्रमात उपस्थितांनी योगासने केली व दररोज योगासने करून आपले शरीर सशक्त व मजबूत ठेवण्याची शपथ घेतली. या वेळी पतंजली विद्यापीठातील प्रशिक्षित योग शिक्षक विवेक खिर्डेकर यांनी उपस्थितांना योगासने करायला लावली. भाजप शहर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, नगरसेवक शत्रुघ्न काकडे, शैलेंद्र त्रिपाठी, गिरीश गुप्ता आदी उपस्थित होते.



**पनवेल : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त माची प्रबळगड येथे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात नगरसेविका दर्शना भोईर यांच्यासह युवा व ज्येष्ठ कार्यकर्ते सहभागी झाले होते.**



**पनवेल : ब्रम्हाकुमारीजच्या वतीने योग दिन साजरा करण्यात आला. या वेळी नगरसेविका दर्शना भोईर, बह्माकुमारीजच्या तारादीदी, पत्रकार गणेश कोळी यांची उपस्थिती लाभली.**

## वाहन चोरीसह घरफोडी करणारा अटकेत; नऊ गुन्ह्यांचा मुद्देमाल हस्तगत



**पनवेल : वार्ताहर**

वाहन चोरीसह घरफोडी करण्याऱ्या सराईत गुन्हेगारास न्हावाशेवा पोजिसांनी गजाआड केले आहे. त्याच्याकडून नऊ गुन्ह्यांचा तीन लाख ३१ हजार ४६९ रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील परिसरातून मोठ्या प्रमाणावर मोटरसायकल, टैम्पो व इतर वाहने चोरीच्या घटना घडत असल्याने, चोरीच्या घटनांचा प्रतिबंद व्हावा तसेच चोरीच्या घटनेतील आरोपीत यांचा शोध घेऊन ही कायदेशीर कारवाई करण्यात आली. न्हावा शेवा पोलीस ठाणे हद्दीतून सोनारीगाव येथुन महिंन्दा कंपनीची बोलेरो पिकअप टैम्पो (एमएच ४६-ई-९२७१) ही चोरी झाल्याबाबतची तक्रार दाखल करण्यात आली होती.

या गुन्ह्याबाबत वरिष्ठांचे मार्गदर्शनानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे यांनी एक पथक स्थापन केले. यापथकाने पोलीस ठाणे हद्दीतील तपास करून आरोपी कौशल पाटील यास जांभुळपाडा येथुन ताब्यात घेऊन त्यास अटक केली. त्याच्याकडून न्हावाशेवा पोलीस ठाणे, पनवेल शहर पोलीस ठाणे, वडखळ पोलीस ठाणे हद्दीत केलेल्या नऊ गुन्ह्यांची उकल करण्यात आली असून त्यामध्ये मोटर वाहन चोरी व घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत.



**पनवेल : इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या वतीने पनवेल महापालिकेच्या दि. बा. पाटील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी नगरसेविका दर्शना भोईर, पालिकेचे अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग बाळासाहेब चिमणे, इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्ष सुलभा निंबाळकर, शोभना पालेकर, शाळेचे मुख्याध्यापक राठोड आदी उपस्थित होते.**

## कोटगाव येथे कार्यालयाचे उद्‌घाटन

**उरण : बातमीदार**

कोटगाव प्रकल्पग्रस्त रेल्वे कृती सेवा संस्था (रेल्वे कमिटी उरण) व कोटगाव ग्रामसुधारणा मंडळ यांचे संयुक्त कार्यालयाचे उद्‌घाटन शिव मंदिरासमोर, रेल्वे स्टेशन कोटनाका येथे जेएनपीटीचे विश्वस्त कॉम्रेड भूषण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी किसान संघटनेचे अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य कैलास भोईर, रेल्वे कमिटीचे अध्यक्ष नवनीत भोईर, कार्याध्यक्ष निलेश भोईर, कमिटी सचिव सुनील भोईर, कोटगाव ग्रामसुधारणा मंडळाचे अध्यक्ष योगेश गोवारी, भारतीय जनता पक्षाचे उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, रेल्वे प्रशासनाचे साईड इन्चार्ज डी के सिंग, टीआयपीएल कंपनीचे साईड इन्चार्ज महादेव यादव, रेल्वे कमिटीचे सदस्य दीपक भोईर, सुरज पाटील, सुभाष गोवारी, शंकर भोईर, सुभाष भोईर, कृष्णा जोशी, देविदास गोवारी, हेमदास गोवारी, सुनील पाटील, राजेश भोईर, महेश कोळी, भालचंद्र कोळी यांच्यासह कोटगाव प्रकल्पग्रस्त रेल्वे कृती सेवा संस्था व कोटगाव ग्रामसुधारणा मंडळाचे पदाधिकारी सदस्य या वेळी उपस्थित होते.



## अपघातानंतर पळून जाणारा एसटी चालक अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

साईकृपा हॉटेल, शिरढोण येथे भांडी घासण्याचे काम करणारा नारायण रामचंद्र पोटले (भोपळीपेण, माणगाव) याला अज्ञात वाहनाने दिलेल्या धडकेत त्याचा जागीच मृत्यू झाला होता. त्या ठिकाणी एमएच २० बीएल ३२७६ या क्रमांकाची नंबर प्लेट पडलेली पोलिसांना आढळली. या नंबर प्लेटच्या आधारे तपास करून शहर पोलिसांनी एसटी चालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. त्याला न्यायालयात हजर केले असता त्याची जामिनावर मुक्तता करण्यात आली आहे. शरद लहानु मुठे (वय ४१, रा. नाशिक) असे त्या एसटीचालकाचे नाव आहे.

## पत्रकार सय्यद अकबर यांना पुरस्कार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलचे ज्येष्ठ पत्रकार सय्यद अकबर यांना पत्रकारिता समाजकारण आणी क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल जयहिंद फाउंडेशनकडून खारघर येथे भाजप महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष माधव भंडारी यांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

जयहिंद फाउंडेशनने सैनिक हो तुमच्यासाठी संकल्पना राबवून सीमेवर शहीद झालेल्या कुटुंबीयांना मदत करण्याची अनोखी मोहीम देशभरात राबवली आहे. जयहिंद फाउंडेशनतर्फे माधव पाटील, संजय कदम आदी पत्रकार तसेच विविध सामाजिक कार्यकर्त्यांना भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष ज्येष्ठ नेते माधव भंडारी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, भारताचे संविधान, शहीदगाथा हे पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी काही पुरस्कारप्राप्त मान्यवरांनी आपले विचार मांडले.

## संपादकीय

# बुडत्याचा पाय खोलात

विधान परिषदेच्या जागा जिंकताना भाजपचे संख्याबळ १३४ मतांवर गेले ही साधीसुधी बाब म्हणता येणार नाही. त्यानंतर घडणार्‍या घडामोडींमुळे तर महाविकास आघाडीचे सरकार अल्पमतात गेल्याचे चित्र दिसू लागले आहे. येत्या एक-दोन दिवसांत चित्र अधिक स्पष्ट होईल हे खरे. पण या सरकारची घटका आता भरली आहे एवढे मात्र निश्चित झाले आहे.

**महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या जे काही सुरू आहे, त्यामुळे कुठल्याही जातिवंत मराठी माणसाला आनंद होण्यासारखी परिस्थिती नाही. हिंदुहृदयसम्राट स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांनी एकेकाळी बांधलेल्या शिवसेना नावाच्या संघटनेची आज सत्तेच्या लोभापायी परवड होताना पाहून कुठल्याही मराठी माणसाला दु:ख झाल्याशिवाय राहणार नाही. त्यात भारतीय जनता पक्षदेखील आला. दहा दिवसांपूर्वी राज्यसभा सदस्यांच्या निवडणुकीच्या वेळी विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांनी चमत्कार घडवत भाजपचे तीन उमेदवार सहजी निवडून आणले होते. खुल्या पद्धतीने आमदारांचे मतदान होऊनही सत्ताधारी महाविकास आघाडीची तब्बल दहा मते तेव्हा फुटली. १०६ आमदारांचे भक्कम पाठबळ असलेल्या भाजपला ७ अन्य आमदारांचे समर्थन होते. एकूण ११३ संख्याबळाच्या जोरावर भाजपने सत्ताधारी महाविकास आघाडीला अडीच वर्षे 'दे माय धरणी ठाय' केले. राज्यसभा सदस्य निवडणुकीच्या वेळी हेच संख्याबळ १२३ वर गेले. सोमवारी झालेल्या विधान परिषद निवडणुकीत भाजपने पाच उमेदवार रिंगणात उतरवले होते, तर महाविकास आघाडीने हट्टाने सहा उमेदवार निवडणुकीच्या मैदानात आणले. वास्तविक दहा जागांसाठी अकरावा उमेदवार देण्याचे काँग्रेसने टाळले असते तर ही निवडणूक बिनविरोध झाली असती. परंतु महाविकास आघाडीमध्ये समन्वय आणि राजकीय प्रगल्भता याचा संपूर्ण अभाव आहे याचे प्रत्यंतर पुन्हा एकदा आले. या निवडणुकीत पुन्हा एकदा चमत्कार घडवत भाजपने सत्ताधार्‍यांना धोबीपछाड दिली. इतकेच नव्हे तर महाविकास आघाडीची तब्बल २१ मते फोडली. त्यातली किमान १२ मते शिवसेनेचीच होती असा दावा केला जात आहे. तसे असेल तर ती शिवसेनेसाठी धोक्याची घंटा मानायला हवी. विरोधीपक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांची चतुराई आणि राजकीय बुद्धिमत्ता याची चुणुक पुन्हा एकदा बघायला मिळाली. फडणवीस यांच्यासारखा बुद्धिमान आणि समंजस नेता या घटकेला महाराष्ट्रात दुसरा नाही हे सत्य आता त्यांच्या विरोधकांनाही स्वीकारावे लागेल. अल्पमतात गेलेले सरकार वाचवण्यासाठी महाविकास आघाडीचे नेते आता धावाधाव करत आहेत. परंतु यावेळेस मिळालेला धक्का पचवण्याजोगा नाही याची जाणीव आता त्यांना झाली असेल. वास्तविक राज्यसभा निवडणूक किंवा विधान परिषद निवडणूक यामध्ये महाविकास आघाडीच्या वाट्याला आलेला दारूण पराभव हा ओढवून घेतलेला पराभव आहे हे स्पष्टच दिसते. काहिसे नमते घेऊन भाजप नेत्यांशी वाटाघाटी केल्या असत्या तर या दोन्ही निवडणुका बिनविरोध पार पाडता आल्या असत्या. झाकली मूठ सव्वा लाखाची राहिली असती. गेली अडीच वर्षे हेच सरकार गुप्त मतदान टाळत आले होते. कारण गुप्त मतदान झाले तर महाविकास आघाडीचा भ्रमाचा भोपळा फुटेल याची सत्ताधार्‍यांना कल्पना होती. भाजपचे नेते नेमक्या याच संधीची वाट पाहात होते. विधान परिषद निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने झाली. त्याचा दणका महाविकास आघाडी सरकारला खावा लागला. जे अटळ होते. पुढील काही दिवस शिवसेनेचा पाय अधिक खोलात जाताना पहावा लागणार आहे.**

# मुलांमधील क्षमतांचा विचार करून करिअर निवडा!

**खबरबात**
**नितीन देशमुख**

दहावीचा निकाल हा सर्वतोपरी महत्त्वाचा असतो. पण आज दहावीच्या गुणांपेक्षा निकालात तुमचे नाव, वडिलांचे नाव, आडनाव, जन्मतारीख आणि इतर महत्त्वाच्या गोष्टी जशा पद्धतीने लिहिल्या असतात त्याच भविष्यात सर्व ठिकाणी लिहून येतात. यासाठी निकालातील या गोष्टी महत्त्वाच्या असतात. कोरोनामुळे गेल्या दोन वर्षांपासून सर्व शाळा आणि कॉलेजेस बंद होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने शिक्षण देण्यात येत होते. गेल्या वर्षी बोर्डाच्या विद्यार्थ्यांचा निकाल विशेष मूल्यांकन पद्धतीने लावण्यात आला होता. यंदा बोर्डाच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आल्या आहेत. त्यामुळे दहावीच्या बोर्डाचा निकाल नेमका कसा लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

बारावीच्या निकालानंतर दहावीचा निकाल कधी लागणार? याबाबत विद्यार्थी आणि पालकांमध्ये कमालीची उत्सुकता होती, मात्र आता ही प्रतीक्षा संपली आहे. कारण, महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल १७ जुलै लागला आहे. यंदाचा २२,९२१ शाळांपैकी १२,२१० शाळांचा निकाल हा शंभर टक्के लागला आहे. २२,९२१ शाळांमधील विद्यार्थांनी दहावीची परीक्षा दिली होती. त्यापैकी १२,२१० शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. तसेच यंदा ६८ विषयांची परीक्षा घेण्यात आली होती. त्यापैकी २४ विषयांचा निकाल हा शंभर टक्के लागला आहे. राज्यात १५ लाख ६८ हजार ९७७ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती. त्यापैकी १५ लाख २१ हजार ००३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यात कोकण विभागाचा सर्वाधिक निकाल लागला आहे. कोकण विभागात सर्वाधिक ९९.२७ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तर, सर्वाधिक कमी निकाल नाशिक विभागाचा लागला आहे. नाशिक विभागाचा निकाल ९५.९० टक्के इतका लागला असून त्यात ९७.९६ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. या परीक्षेत १२२ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण, मिळाले असताना त्याचवेळी २९ शाळांचा निकाल शून्य टक्के लागणे ही धक्कादायक आहे. मात्र सगळीकडे चर्चा सुरु आहे ती ३५ टक्के मिळविणार्‍या विद्यार्थ्याची. पुण्याच्या शुभम जाधवची. या विद्यार्थ्याला ३५ टक्के मिळाले आहेत. त्यांच्या या मार्कांची सगळीकडे चांगलीच चर्चा होत आहे. मराठी, हिन्दी, इंग्रजी, गणित, विज्ञान या पाचही विषयात त्याला ३५ गुण मिळाले आहेत. शुभम हा पुण्यातील गंजपेठेत राहतो. त्याच्या घरची परिस्थिती हलाखीची आहे. तो हार्डवेअरच्या दुकानात काम करतो. दरमहा त्याला सहा हजार रुपये पगार मिळतो. वडील पाण्याच्या टाकीचे दुरुस्तीचे काम करतात तर आई केअर टेकर म्हणून काम करते. नवव्या वर्गात त्याला ६७ टक्के मार्क पडले होते. दहावीत त्याने सगळ्या विषयाचा अभ्यास केला होता. जास्त मार्क मिळतील अशी त्याची अपेक्षा होती. मात्र त्याला कमी मार्क पडले. शुभम पुण्यातील गंजपेठेतील जानाई माळा टिंबर मार्केट जवळ राहतो. रमणबाग शाळेचा तो विद्यार्थी आहे. एक वाजता मित्रमंडळींबरोबर त्याने निकाल पाहिला. निकाल पाहिल्यानंतर त्याला सगळ्याच विषयात ३५ मार्क मिळाल्याचे दिसलं. त्याच्या मित्रांना मात्र जास्त मार्क मिळाले त्यामुळे शुभमचा नाराजीचा सुर आहे. मात्र काठावर पास होणे काय असते याचे मुर्तिमंत उदाहरण म्हणजेच शुभम जाधव आहे.

आता पास झालेल्या मुलांच्या प्रवेशासाठी पालकांची धडपड दिसून येईल. दहावी-बारावीचा परीक्षेचा निकाल लागला की पुढे काय करायचे या विचारात पालक आणि विद्यार्थी संभ्रमात पडतात. विद्यार्थ्यांचे गुण हे आजच्या परीक्षा पध्दतीचा विचार केला तर फसवे असतात. त्यामुळे गुणांचा विचार करून करिअर निवडल्यास मुलाला अभ्यास न झेपल्याने त्याला नैराश्य येऊ शकते आणि त्यातून पालकांनी त्याला दोष दिल्यास नैराश्य आलेल्या मुलांच्या हातून आत्महत्येसारखी घटना घडू शकते. यासाठी मुलाचे करिअर निवडताना फक्त त्याला मिळालेल्या गुणांचा विचार न करता मुलांची बुद्धिमता, स्वभाव, आवड-निवड आणि क्षमता याचा ही विचार करणे गरजेचे आहे. प्रत्येक मूल जन्माला येताना आठ वेगवेगळी बुध्दिमत्ता आणि नऊ वेगवेगळे स्वभाव घेऊन जन्माला येते. प्रत्येकामध्ये त्याचे प्रमाण वेगवेगळे असल्याने त्याचे व्यक्तिमत्व वेगळे असते. करिअर निवडताना मुलामध्ये कोणते चांगले गुण आहेत आणि त्याचा स्वभाव कसा आहे याचा याचा विचार करायला हवा. मी डॉक्टर आहे म्हणजे माझा मुलाने डॉक्टर झाले पाहिजे असे नाही. सुनील गावस्कर महान फलंदाज आहे. पण रोहन गावस्कर त्याच्या सारखा फलंदाज बनू शकला नाही. अमिताभ-जयाच्या अभिनयाची सर अभिषेकला नसल्याची उदाहरणे आपल्या समोर आहेत. त्यामुळे मुलांवर आपला निर्णय लादून त्याचा करिअरची वाट लावू नये.



आपण २१ व्या शतकात वावरतांना शास्त्र प्रगत झाले आहे. मुलांमध्ये कोणत्या प्रकारची बुध्दिमत्ता आहे हे ओळखण्यासाठी एम.आय.टेस्ट.किवा डि.एम.आय.टी यासारख्या आधुनिक परीक्षा देऊन माहिती करून घेता येते. प्रसंगी समुपदेशकाची मदत घेता येते. आपणही आपल्या मुलाचे निरक्षण करून, त्यांच्याशी चर्चा करून त्यांचे चांगले गुण आणि स्वभाव ओळखून त्याला मार्गदर्शन करू शकतो. 'तू हेच करिअर कर हीच शाखा निवड' असे बोलणे खरे तर पालकांनी टाळायला हवे. त्याला स्वत: निर्णय घेण्यासाठी प्रोत्साहित करावे तसे केल्याने त्याचा आत्मविश्वास वाढेल आणि हाच आत्मविश्वास मुलांना यशस्वी करण्यासाठी मदत करेल. एकदा त्यांची आवड आणि क्षमता समजली की त्याची समाजाला गरज आहे का आणि हे केल्याने त्याला पैसा आणि मानसन्मान मिळेल का हे पाहणे. ते शक्य असल्याचे दिसून आल्यास त्याने निवडलेले करियर हे त्याच्यासाठी योग्यच असल्याचे दिसून येईल. डि.एम.आय.टीसारख्या आधुनिक टेस्ट मधून व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंची माहिती होते. मल्टिपल इंटेलिजंट, व्यक्तिमत्व. शिकण्याची पध्दत, विचार शक्ति वगैरे. प्रत्येक मनुष्याच्या अंगीभूत गुणवत्ता असते त्याचा शोध घेऊन स्वत:चे जीवन सुखकर करण्यासाठी त्याचा वापर करणे गरजेचे असते. अनेकांना आपल्यातील हे गुण ओळखण्याची संधी मिळत नाही. या टेस्टद्वारे ही संधी मिळून आपला सर्वांगीण विकास करण्याची दिशा मिळते. डरमेटोग्लायफिक्स ही परिपूर्ण आत्मचिकित्सा आहे. ज्याचा वापर करून अंगीभूत गुणांचा उत्कर्ष करता येतो. या शास्त्राचा उपयोग करून मुलांसाठी अभ्यासाचा योग्य क्रम व पध्दती समजून पालक व शिक्षक त्याचा वापर करून त्यांची प्रगती करू शकतात. अभ्यासाव्यतिरिक्त गुणांचाही विकास करता येऊ शकतो. वागण्यातील बारकावे लक्षात येतात, त्यामुळे एकमेकांच्या वागण्यातून होणारे गैरसमज दूर करून नाते संबंध सुधारता येतात. त्याचे गणित, भाषा व रंगांची समाज बोटांच्या व शरीराच्या हालचालीची कुवत संगीताची गोडी व इतर आवडी निवडी समजतात. त्याची पाच ज्ञानेंद्रिय किती प्रमाणात सक्षम आहेत. त्याची विचार करण्याची व अभ्यास करण्याची पध्दत कोणती आहे. त्याचा बुद्धांक किती आहे. नेतृत्व गुण आहेत का? त्याने कोणत्या शाखेतून शिक्षण घ्यावे याची माहिती मिळते. यासाठी आपण टेस्ट करून समुपदेशकची मदत घेऊ शकता. आज दीपक खाडेंसारखी मराठी माणसे ही या क्षेत्रात चांगले काम करीत आहेत. त्यानी ३००० पेक्षा ६-७ वर्षात समुपदेशन केले आहे. पण आपल्याला मराठी माणसाबद्दल खात्री वाटत नाही. गमंत म्हणजे त्याने आपले मराठी नाव लिहिले होते तर त्याचाकडे कोणी येत नव्हते त्याने आपले नाव के. दीपक लिहिल्यावर त्याच्याकडे पालकांची रांग लागली. आपले कसे आहे मी मराठीचा अभिमान पण मराठी माणसाची मदत घेण्यात कमीपणा वाटतो, असा कोणताही कमी पणा न वाटता मुलांच्या भवितव्याचा योग्य निर्णय अनुभवी समुपदेशकाकडून घेतलेला चांगला. अन्यथा पालकांवर पस्तावण्याची वेळ येऊ शकते. या मुळे याचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# आता प्रोफाइल फोटो, स्टेटसही लपवता येणार

व्हॉटस्ॲप ही एक लोकप्रिय संदेशन प्रणाली आहे. हिच्यामार्फत लोक इंटरनेट वापरून एकमेकांशी चर्चा करतात, संदेश पाठवतात व वाचतात. संदेशासोबत चित्रे, गाणी, व्हीडियो व इतर प्रकारच्या फाईल्सदेखील एकमेकांसोबत सामाईक करता येतात. व्हॉटस्ॲप आपल्या युजर्ससाठी एकामागून एक नवनवीन फीचर्स आणत आहे. याच क्रमाने या सोशल मेसेजिंग साइटने आणखी एक दमदार फीचर आणले आहे. या वैशिष्ट्याच्या मदतीने, वापरकर्ते त्यांचा प्रोफाइल फोटो, लास्ट सीन स्टेटस आणि त्यांच्या कॉन्टॅक्ट लिस्टमध्ये असलेल्या कोणापासूनही लपवू शकतील. हे फीचर आधीच बीटा व्हर्जनमध्ये काही काळापासून उपलब्ध असले, तरी व्हॉटस्ॲपने घोषणा केली आहे की, ते आता सर्व आयओएस आणि अँड्रॉइड वापरकर्त्यांसाठी रोल आउट करत आहेत.




आतापर्यंत, वापरकर्त्यांना सेटिंग्जमध्ये प्रत्येक जण, माझे संपर्क आणि कोणीही नाही असे तीन गोपनीयता पर्याय दिसत होते. या वैशिष्ट्याच्या आगमनाने, त्यांना आता माय कॉन्टॅक्स एक्स्पेट नावाचे एक अतिरिक्त पर्याय दिसेल. या पर्यायावर क्लिक करून, वापरकर्त्यांना ते विशिष्ट संपर्क निवडावे लागतील. ज्यांच्यापासून त्यांना त्यांचे तपशील लपवायचे आहेत. यापूर्वी, व्हॉटस्ॲपने ग्रुप कॉलिंगसाठी एक नवीन फीचर आणले होते, ज्याच्या मदतीने तुम्ही ग्रुप चॅटमध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही व्यक्तीला म्यूट करू शकता. तथापि, एखाद्या व्यक्तीने व्हॉईस कॉल दरम्यान स्वतःला म्यूट करणे विसरल्यास कॉलवर एखाद्याला म्यूट करण्याचे वैशिष्ट्य फायदेशीर ठरेल. तथापि, सहभागी अनम्यूट बटण दाबून कधीही स्वतःला अनम्यूट करू शकतो. जान कोऊम आणि ब्रेन ॲक्शन या दोघांनी व्हॉटस्ॲप हा मोबाइल ॲप्लिकेशन बनविला होता. हे ॲप्लिकेशन एवढे प्रसिद्ध झाले की, फेसबुकसारख्या मोठ्या कंपनीने ते विकत घेण्याचा प्रस्ताव मांडला आणि त्यांनी ते विकत सुद्धा घेतले. आज व्हॉटस्ॲपचे सगळ्यात जास्त युझर्स भारतामध्ये आहेत. व्हॉटस्ॲप सर्वात जास्त डाऊनलोड केलेला पाचवा ॲप्लिकेशन आहे. व्हॉटस्अप वर दररोज ४३०० दशलक्ष संदेश पाठवले जातात. व्हॉटस्अप वर दररोज १६० दशलक्ष फोटो शेअर केले जातात.

# अवकाशस्थ तारका सुनीता विल्यम्स

**निमित्त**

सुनीता विल्सम्सचा जन्म १९ सप्टेंबर १९६५ ला झाला होता. अमेरीकेतील ओहियो राज्यात युक्लिड नगरमध्ये त्यांचा जन्म झाला. नीदरम, मैसाचुसेट्स येथे सुनिता लहानाची मोठी झाली आणि शालेय शिक्षण प्राप्त केले. सुनीता विल्सम्सने १९८३ साली मैसाचुसेट्स येथून हायस्कूल चे शिक्षण पूर्ण केले. पुढे १९८७ ला संयुक्त राष्ट्राच्या नौसैनिक अकादमीतून फिजीकल सायन्स या विषयात बीएस परीक्षा उत्तीर्ण केली. त्यानंतर सुनिताने १९९५ला फ्लोरिडा इस्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी येथून इंजिनियरींग मॅनेजमेंट मधून मास्टर ऑफ सायन्स पदवी प्राप्त केली. सहा एप्रिल २००७ ला सुनीता यांनी अंतराळातच बोस्टन मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला आणि त्यांनी फक्त ४ तास २४ मिनिटांमध्येच ते पूर्ण केले. या स्पर्धेमुळे सुनीता विल्यम्स अंतराळात मॅरेथॉनमध्ये धावणारी पहिली व्यक्ती ठरल्या आणि २२ जुन २००७ला त्या पृथ्वीवर परतल्या. त्यांच्या कार्याचा घेतलेला हा छोटासा आढावा.



सुनितांचे वडिल दीपक एन. पांड्या डॉक्टर असून एक प्रसिध्द शास्त्रज्ञदेखील आहेत. ते मुळचे भारतातल्या गुजराज राज्यातील आहेत. सुनितांच्या आईचे नाव बॉनी जालोकर पांड्या असून त्या स्लोवेनिया येथील आहेत. सुनिता यांना एक मोठा भाऊ आणि एक मोठी बहिणदेखील आहे. सुनिता यांचे वय ज्या वेळी एक वर्षापेक्षादेखील कमी होते, त्यावेळीच त्यांचे वडिल अहमदाबाद येथून अमेरिकेला स्थायीक झाले. हे बहिण भावंड आपल्या आजी आजोबा, बरेचसे काका-काकू चुलत भावंडांपासून दुर जाण्यास इच्छुक नव्हते तरीदेखील वडीलांच्या नोकरीमुळे त्यांना अमेरिकेला स्थानांतरीत व्हावे लागले. अंतराळाची सफर करणारी भारतीय वंशाची दुसरी महिला सुनीता विल्सम्स यांनी आपल्या आई-वडिलांकडून प्रेरणा घेतली आहे.

सुनितांचे वडिल फार सरळ स्वभावाचे आहेत. सामान्य जीवन जगण्यावर त्यांचा विश्वास आहे. वडिलांचे हे विचार सुनिता यांना फार प्रभावित करतात.

सुनितांची आई बॉनी जालोकर पांड्या यांनी आपल्या कुटुंबाला एका सुत्रात बांधण्यात यश मिळविले आहे. नात्यांची मुल्य जपणं आणि नात्यांचा गोडवा टिकऊन ठेवणे यावर त्या भर देतात, या सोबतच निसर्गमुल्यांची त्यांना चांगली जाण आहे. प्रकृतीच्या मुल्यांची जाणीव सुनितांना आपल्या आईकडून संस्कारात मिळाली आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधींना सुनिता आपला रोल मॉडल मानतात. त्यांच्या विचारांवर चालण्याचा त्या नेहमी प्रयत्न करतात.

सुनिता विल्यम्स यांची देवावर आस्था आहे. हिंदुच्या सर्वोच्च अशा भगवान गणेशावर त्यांची श्रध्दा आहे. असं म्हणतात की, आपल्या अंतराळ यात्रेदरम्यान सुनिता हिंदुंचा पवित्र असा भगवतगीता हा ग्रंथ आपल्या सोबत घेऊन त्या गेल्या होत्या. भगवान श्रीकृष्णाने भगवतगीतेत केलेल्या उपदेशांना सुनिता आपल्या जीवनात अंगीकारण्याचा प्रयत्न करतात. सुनीता विल्यम्स सोसायटी ऑफ एक्सपेरिमेंटल टेस्ट पायलटच्या सदस्यदेखील राहिल्या आहेत. मुळ भारतीय वंशाच्या अमेरीकी नौसेना कॅप्टन सुनीता विल्सम्स इतर मुलींपेक्षा वेगळ्या होत्या. लहानपणापासूनच काहीतरी वेगळे करण्याचे त्यांचे स्वप्नं होते. त्याप्रमाणे त्यांनी ते स्वप्न पूर्ण केले आहे.



**क्लिक...क्लिक...!**

**मुरूड : जूनच्या तिसरा आठवडा आठवड्यात पावसाला जोर वाढेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. काही ठिकाणी पाऊस पडला. सध्या जोर नसला तरी सगळीकडे पाऊस सुरू आहे. यामुळे वर्षा पर्यटनासाठी पर्यटक बाहेर पडू लागले आहेत. मुरुडच्या समुद्रकिनारी पर्यटकांनी येत समुद्राच्या लाटांचा आनंद घेतला.** (छाया सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# बैठी जीवनशैली आणि वजन

आपल्या आई-वडिलांच्या किंवा आजी-आजोबांच्या तुलनेत, आपण अशा सवयीमध्ये जास्त वेळ घालवतो, ज्यामध्ये शारीरिक हालचाली केवळ कमी होत नाहीत, तर अधिक काळ घर, कार्यालय आणि क्लबमध्ये फक्त बसून राहणे वाढते. तंत्रज्ञानातील प्रगतीने असे वातावरण तयार केले आहे, जे अधिक बसून आणि कमी हालचाल करण्यास प्रोत्साहन देते.

आपण आता संपूर्ण दिवस टीव्ही पाहण्यात, व्हिडिओ गेम खेळण्यात, खाण्यात, घरी बाहेरून जेवण मागवण्यात आणि अर्थातच डेस्कवर काम करून बसून घालवू शकतो. शिवाय, शाळा, ऑफिस आणि विविध सार्वजनिक ठिकाणे अशा प्रकारे डिझाइन केली आहेत की तिथे कार, बस, लिफ्ट, एस्केलेटरची सोय असल्याने शारीरिक हालचाल अधिकच कमी होते. अनेकांना हे माहीत आहे, की जास्त बसणे त्यांच्या आरोग्यासाठी हानिकारक असू शकते. मात्र, हे केवळ अंशतः सत्य आहे. जेवताना, विश्रांती घेताना किंवा प्रवास करताना आपला बहुतेक वेळ बसण्यात जाणे साहजिक आहे, परंतु अधिक काळ बसून राहणे ही समस्या बनू शकते. दीर्घकाळ बसणे विविध आरोग्यविषयक गुंतागुंतीशी जोडलेले आहे जसे की तुमचे शरीर चालणे, उभे राहणे आणि अजून बर्‍याच हालचाली करण्यासाठी ऊर्जा वापरते. जेव्हा तुम्ही जास्त वेळ बसता तेव्हा तुमच्या शरीरातील ऊर्जा कमी वापरली जाते. परिणामी तुम्ही कमी कॅलरीज जाळता ज्यामुळे लठ्ठपणा आणि लठ्ठपणा-संबंधित समस्यांचा धोका वाढतो.

तुम्ही सक्रिय असताना किंवा विश्रांती घेत असताना, तुमचे शरीर अजूनही ऊर्जा वापरत असते, ऑक्सिजन शरीरात घेते आणि कार्बन डायऑक्साईड बाहेर टाकते. मात्र, विश्रांती आणि हालचाल करताना तुम्ही किती ऊर्जा किंवा ऑक्सिजन घेता यात फरक आहे. उदाहरणार्थ, तुमचे वजन ६० किलो असल्यास, तुम्ही विश्रांतीच्या वेळी प्रति मिनिट २१० मिली ऑक्सिजन वापरता. मात्र, तुम्ही चालत असताना किंवा उभे असताना, तुमच्या हालचालीच्या तीव्रतेनुसार तुम्ही वापरत असलेला ऑक्सिजन जास्त असेल. ऑक्सिजनचे प्रमाण जितके जास्त तितकी तुमच्या शरीराला त्या क्रियाकलापासाठी अधिक ऊर्जा लागेल. बसताना, ऑक्सिजनचे सेवन कमी होते आणि तिथूनच समस्या सुरू होते कारण तुमचे शरीर कमी ऊर्जा वापरते. उदाहरणार्थ, एका अभ्यासात असे दिसून आले आहे की जे लोक डेस्क जॉब करतात त्यांच्या तुलनेत कृषी कामगार १००० जास्त कॅलरीज बर्न करू शकतात. कारण हे कामगार दिवसाचा अधिक वेळ चालण्यात आणि उभे राहण्यात घालवतात. तुम्हाला शक्य असेल तिथे लिफ्टऐवजी पायर्‍या वापरण्याचा प्रयत्न करा. ऑफिसच्या वेळेत, दर ३० मिनिटांनी जागेवरून उठा किंवा चाला. मात्र स्वतःला सक्रिय ठेवा.

# रायगड जिल्ह्यात योग दिन उत्साहात



**महाड : प्रतिनिधी**

जागतिक योगादिनी महाड भाजपच्या वतीने मंगळवारी (दि. २१) योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी योगासनांचे महत्त्व पटवून देण्यात आले, तसेच नवोदित डॉक्टरांचा सत्कार कलण्यात आला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय योग्य विद्येला जागतिक मान्यता मिळवून दिली आहे. म्हणून २१ जून रोजी जगभर योगादिन साजरा केला जातो. महाड भाजपच्या वतीने मंगळवारी विरेश्वर मंदिर सभागृहात योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. माधव डाकवे, शलाका वारंगे आणि गिरीष साळी यांनी या शिबिरात योगासने आणि योगाविषयी माहिती दिली. तसेच नवोदित डॉ. ऋषीकेश कुद्रीमोती, डॉ. सायली बुटाला, डॉ. सत्यम कळसकर, डॉ. रुचा शहा, डॉ. रुचा मिरगल, डॉ. श्रृती सलागरे यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट फोटोग्राफी पुरस्कार मिळालेले मित डाकवे यांचादेखील सन्मान करण्यात आला. या शिबिरात महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष हेमाताई मानकर, तालुका अध्यक्ष जयवंत दळवी, उपाध्यक्ष नाना महाले, सरचिटणीस महेश शिंदे, संदिप ठोंबरे, निलीमाताई भोसले, मंजुषा कुद्रीमोती, वाहतूक सेल अध्यक्ष नाना पोरे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, नमिता दोशी, कल्पना विचारे, प्राजक्ता दळवी, अदिती ताडफळे, तुषार महाजन, सुमीत पवार आदि मान्यवर या वेळी उपस्थित होते.



(छाया : महेश शिंदे)




(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये मंगळवारी (दि. २१) आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. या वेळी प्रा. हर्षल जोशी यांनी मानवी जीवनातील योगाचे महत्त्व उदाहरणांसह सांगितले. व प्राणायाम, कपालभारती आदी आसनांविषयी माहिती देऊन प्रात्यक्षिके सादर केली. या कार्यक्रमात एकूण ५९ विद्यार्थी सहभागी झाले होते. या वेळी १२ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. डॉ. प्रा. चंद्रकांत माळी, प्रा.अशोक मोरे, ग्रंथपाल अमित बाकाडे, दिलीप ढेपे, भारत पवार, दिनेश कुळे व दिलीप बक्कम यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

**कर्जत : प्रतिनिधी**

कोंकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात मंगळवारी (दि. २१) योगदिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी व शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये एका विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. योगशिक्षिका मंजिरी गोगटे यांच्या हस्ते समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य डॉ. मोहन काळे यांनी प्रास्ताविकात योग दिनाचे महत्त्व विषद केले.

योग साधना करताना मन शांत असावे. आसन करताना ओढून ताणून करू नये. योग्यरितीने प्राणायम केल्यास सर्व रोग दूर होतात. मात्र चुकीच्या पद्धतीने केल्यास अन्य रोग जडू शकतात, असे योगशिक्षिका मंजिरी गोगटे यांनी स्पष्ट केले.

योगामुळे आपले शरीर सुदृढ होईलच शिवाय आपले मनही शांत राहील. विद्यार्थ्यांना योगसाधनेचा आयुष्यभर फायदा होईल, असे महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे यांनी सांगितले. योगशिक्षिका अपर्णा लेले आणि प्रा. शिशुपाल बोधले यांनीही समयोचित मार्गदर्शन केले.

प्रा. जान्हवी आहेर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. योगशिक्षिकांनी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांकडून योग प्रात्यक्षिके करून घेतली. प्रा. प्रीतम जुवाटकर, डॉ. भरत टेकाडे, डॉ. अमोल चांदेकर, प्रा. ज्योती लहाने, प्रा. निलोफर खान, प्रा. इनिया कुमारी आदी या वेळी उपस्थित होते



(छाया : विजय मांडे)

**रोहे :** एम. बी. मोरे फाउंडेशनच्या धाटाव येथील महिला महाविद्यालयात मंगळवारी आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. या वेळी सर्व विद्यार्थिनींना योगाचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच विद्यार्थिनींकडून योगासनांची प्रात्याक्षिके करून घेण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मयुरी लहाने आणि ग्रंथपाल निर्मला थोरात यांनी केले. कोकण शेतकरी व मजूर समाज संस्थेच्या अध्यक्षा प्रियांका कांबळे, उपसचिव मच्छिंद्र पाटील, योगशिक्षिका सुनीता नकाते, अॅड. सारिका पाटील, सुभाष पाटील या कार्यक्रमाला उपस्थित होते. प्रा. प्रतिमा भोईर यांनी आभार मानले.



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

भारतीय तटरक्षक दल आणि वसंतराव नाईक महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना युनिट यांच्या संयुक्त विद्यमानाने मंगळवारी सकाळी नाईक महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त योगासनांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी योगासने करावीत, असे आवाहन प्राचार्य डॉ. मेहबुबनगरबावडी यांनी केले. प्रत्येकाने दैनांदिन जीवनात योगा करणे महत्त्वाचे आहे, असे मत उपप्राचार्य डॉ. विश्वास चव्हाण या वेळी व्यक्त केले. या वेळी प्राणायाम, ताडसन, प्रत्याहार, वक्रासन, अनुरोलम, धारणा, ध्यान, समाधी आदी योगप्रकार करण्यात आले.

तटरक्षक दलाचे विजय तंटा, आनंदी स्थापक, अमोलकुमार मुसळे, योगप्रशिक्षक प्रमोद मसाल, महाविद्यालयाचे डॉ. श्रीशैल बहिरगुंडे, डॉ. मुरलीधर गायकवाड, डॉ. सुभाष म्हात्रे, गजानन मुनेश्वर, डॉ. नारायण बागुल, डॉ. सिमा नाहिद, डॉ. मधुकर वेदपाठक, संदेश दांडेकर, श्रीकांत पालशेतकर, गणेश लाड यांच्यासह विद्यार्थी या वेळी उपस्थित होते.



(छाया : राकेश खराडे)

**चौक, मोहपाडा : रामप्रहर वृत्त**

विद्या प्रसारिणी सभा या संस्थेच्या चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयामध्ये मंगळवारी (दि. २१) योगादिन आयोजित करण्यात आला होता. संस्थेचे सेक्रेटरी योगेंद्र शहा यांनी योगाचे महत्त्व विषद करून विद्यार्थ्यांसह विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली.

शाळेचे शिक्षक कुंभार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक बादशा भोमले, पर्यवेक्षक दिलीप मोळीक यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी या वेळी उपस्थित होते.

**पेण : प्रतिनिधी**

जागतिक योग दिनानिमित्त पेणच्या आरोग्य अधिकारी अपर्णा खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी वाशी प्राथमिक आरोग्य केंद्रात योगदिन साजरा करण्यात आला. या वेळी योगप्रशिक्षक प्रभाकर सोनावणे यांनी योगाचे प्रात्याक्षिक दाखवून विविध योगासने व प्राणायमाबाबत उपयुक्त माहिती दिली.

यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. मैत्रेयी पाटील, वाशी सरपंच गोरखनाथ पाटील आदींसह वाशी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी यांनी या उपक्रमात सहभाग घेतला.



(छाया : अनिस मनियार)





(छाया : संजय खांबेटे)

**म्हसळा : प्रतिनिधी**

कोकण उन्नती मित्र मंडळाच्या म्हसळा येथील वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅ. ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी जागतिक योगदिना निमित्त प्रा. आर. एस. माशाळे यांनी शिक्षक आणि विद्यार्थ्यांना योगासनांविषयी सखोल माहिती देऊन योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली.

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला प्रभारी प्राचार्य डी. ए. टेकळे, प्रा. एम. एस. जाधव, प्रा. शिरीष समेळ, प्रा. सुमित चव्हाण, मल्लिका तांबे यांनी सहकार्य केले. महाविद्यालयीन शिक्षक व विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. डॉ. उत्तम बेंद्रे यांनी आभार मानले.

**रोहे : प्रतिनिधी**

कोएसोच्या रोहा येथील मेहेंदळे हायस्कूलमध्ये मंगळवारी आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला. नारायण पानसरे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य रमेश मोसे यांनी योगदिनाचे महत्त्व समजावून सांगितले.

के. आर. पाटील, चांदोरकर सर, पिटी शिक्षिका वाघमारे व डी. एम. पवार, संगीत शिक्षक आर. पी. पाटील, चित्रकला शिक्षक दाभाडे, भालेराव इत्यादी शिक्षकांनी योग प्रात्यक्षिकांमध्ये सहभाग घेऊन व एनसीसी विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिके करून योग दिवस साजरा केला.



(छाया : महादेव सरसंबे)


मा. १४वे सह दिवाणी न्यायाधीश श्री. मुद्दस्सर यांचे न्यायालयात

प्रोसेस फी जमा रु. अर्जदारातर्फे वकील कु. सोनिया ना. शिरसाठ

## जाहीर नोटीस

दिवाणी चौकशी अर्ज नं. ६७५/२०२२
नि. ६
ने. ता. २२/०७/२०२२

**मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब सी.बी.डी. बेलापूर वाशी यांचे न्यायालयात**

इकमुद्दिन शेख ..... अर्जदार
आणि
खुर्शीद शेख व इतर १ .....सामनेवाले

सर्व लोंकाना या नोटिसद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, **कै. मालनबी हबिब शेख** यांचे दि. ०५/०२/२०१३ रोजी **टी.एस. एल ५००१, हनुमान नगर, तुर्भे नाका, तालुका–ठाणे, जिल्हा–ठाणे, महाराष्ट्र** येथे निधन झाले असून त्यांचे कायदेशिर सरळ वारस म्हणून अर्जदार क्र. १ सामनेवाले क्र. २ मुलगा व सामनेवाले क्र. ३ ही मुलगी **रा. हाऊस नं. ५१३८, हनुमान नगर, तुर्भे नाका, नवी मुंबई** यांनी खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

घर नं. ५००१, हनुमान नगर, तुर्भे नाका, नवी मुंबई – ४००७०३.

वरील अर्जदार व सामनेवाले हे मयत **कै. मालनबी हबिब शेख** यांचे वारस आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील,

तसेच अर्जदार हे **कै. मालनबी हबिब शेख** यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसादाखला मंजुर करील याची दखल घ्यावी.

आज दि. २०/०६/२०२२ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिली.

सही/–
जुनिअर क्लर्क

कोर्टाचा शिक्का

सही/–
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर वाशी



सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

अंतिम नगर रचना परीयोजना नैना क्र. २ (चिपळे, विहीघर, देवद, भोकरपाडा, बेलवली, सांगडे) ही नगर रचना परियोजना नियम क्र. १३ (९) सहीत महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमांच्या कलम ७२ च्या पोटकलम (७) अन्वये दिनांक ६ जून २०२२ रोजी तयार झालेली आहे. सदर अंतिम नगर रचना परीयोजना ही प्रसिद्ध करण्यात आलेली असून त्याच्या प्रती जमीन मालक व जनता यांच्या अवलोकनार्थ लवाद यांचे तसेच विशेष नियोजन प्राधिकरण नैना यांचे सातवा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथील कार्यालयात कामकाजाचे वेळेत ठेवण्यात आलेल्या आहेत.

या संदर्भात महाराष्ट्र नगर रचना नियम १९७४ च्या नियम क्रमांक १३(९) प्रमाणे विहीत नमुना ५ मध्ये सूचना परीयोजनेतील प्रत्येक भूखंडधारकाला पोस्टाने पाठविलेली आहे. परंतु अपुरे पत्ते किंवा अन्य कारणांमुळे उक्त सूचना काही भूखंडधारकांना मिळालेली नसल्याची शक्यता आहे. त्यामुळे ज्या जमीनधारकांना सदर सूचना नमुना ५ प्राप्त झाल्या नसतील त्यांनी आपली सूचना नमुना ५ नैना कार्यालयातून प्रत्यक्ष घेऊन जावी ही विनंती.

(सु. व. सुर्वे)
लवाद, नगर रचना परियोजना, नैना क्र.२
(चिपळे, विहिघर, देवद, भोकरपाडा, बेलवली, सांगडे)

दिनांक : २०/०६/२०२२

**पत्ता : नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

दूरध्वनी क्रमांक: ०२२ ६२५५०३५५

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/११९/२०२२–२३



## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत त्यांचे विद्यमान मालक श्री. नरेंद्र वेलजी सेठिया यांचेकडून कायमस्वरूपी हि मिळकत विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस देण्याबाबत विद्यमान मालकांनी संमती दिलेली आहे .

**मिळकतीचे वर्णन : मौजे विंधणे, ता. उरण, जि. रायगड**

| गट क्रमांक | हिस्सा क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे. आर) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १८१ | ३ | १ | ०–६९–८० | ६. ६२ |
| | | एकूण क्षेत्रफळ | ०–६९–८० | |

वर वर्णन केलेली मिळकत , मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबे कब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकाने दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे .


सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्यही प्रकारे हक्क , हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स मेहेर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क, हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींना सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधितांच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत आणून द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आम्ही सदर व्यवहार पूर्ण करू व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

दिनांक : २१/०६/२०२२

**सही /–**
**अॅड. निलेश बा. झंजाड**
**पत्ता : बी–१०४ सफायर सी.एच.एस. भूखंड–क्रमांक ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका पनवेल, जिल्हा–रायगड, मो.क्र. ९९२०४ ७५८०१**

# हिवताप प्रतिरोधासाठी विशेष मोहीम

## नवी मुंबईत पालिकेकडून डास उत्पत्ती स्थानांची तपासणी





**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेतर्फे जून महिना हा हिवताप प्रतिरोध महिना म्हणून साजरा करण्यात आला असून सदर महिन्यामध्ये संवेदनशील कार्यक्षेत्रातील घरांतर्गत विशेष डास उत्पत्ती स्थाने शोध मोहिम तसेच ताप रुग्ण शोध मोहिम राबविण्यात आली. या मोहिमे अंतर्गत माहे जून २०२२ मध्ये २० दिवसात एकूण ३२१९० एवढ्या घरांना भेटी देण्यात आलेल्या असून त्यापैकी एकूण ५७४०५ एवढया घरांतर्गत स्थानांची तपासणी करण्यात आलेली आहे. त्यामध्ये एकूण २८८ एवढी स्थाने दुषित आढळून आलेली आहेत.

हिवताप, डेंग्यु, चिकनगुन्या असे आजार होऊ नये यासाठी प्रत्येकाचा लोकसहभाग महत्त्वाचा आहे. लोकसहभागानेच हिवतापासारख्या आजारापासून आपण मुक्ती मिळवू शकतो. किटकजन्य आजरामध्ये हिवताप, डेंग्यु, चिकनगुनिया यासारखे आजार होतात. त्यापैकी हिवतापाचा प्रसार ॲनाफिलिस डासाच्या मादीपासून होतो. या डासांची उत्पत्ती साठलेल्या स्वच्छ पाण्यात उदाहरणार्थ पाण्याच्या टाक्या, कुलरचे पाणी, रांजण, माठ, स्वच्छ पाण्याची डबकी यासारख्या साठवलेल्या पाण्यात होते. डास हिवताप रुग्णास चावतो. त्यावेळेस रक्ताबरोबर हिवतापाचे जंतू डासाच्या पोटात जातात. असा दूषित डास निरोगी माणसास चावल्यास १० ते १२ दिवसांनी थंडी वाजून ताप येवून डासाद्वारे हिवतापाचा प्रसार होतो. त्यादृष्टीने नागरिकांनी विशेष काळजी घेणे गरजेचे आहे, तसेच जून महिन्यामध्ये २० दिवसात नियमित घरांतर्गत डास उत्पत्ती स्थाने शोध मोहिमेंतर्गत एकूण ६४,८५८ एवढया घरांना भेटी देण्यात आलेल्या असून त्यापैकी एकूण ९,१९,३९३ एवढया घरांतर्गत स्थानांची तपासणी करण्यात आलीये. त्यामध्ये १०१४ एवढी स्थाने दुषित आढळून आलेली आहेत. त्यापैकी ७१६ एवढी स्थाने नष्ट करण्यात आलेली असून उर्वरित २९८ एवढी स्थाने उपचारीत करण्यात आलेली आहेत.

नवी मुंबई महापालिकेच्या बांधकाम क्षेत्रातील एकूण १७ ठिकाणी हिवताप जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये एकूण ३४८३ इतके लोक सहभागी झाले असून त्यांचे प्रबोधन करण्यात आले, तसेच कार्यक्षेत्रात सार्वजनिक ठिकाणी हस्तपत्रक, पोस्टर्स व बुकलेटचे वाटप करुन हिवताप/संशयित डेंगी इत्यादी किटकजन्य आजाराबाबतची जनजागृती करण्यात आलेली आहे.

किटकजन्य आजार टाळण्यासाठी डासांची उत्पत्ती होवू न देणे हा सर्वोत्तम पर्याय आहे. यासाठी साचलेले पाणी वाहते करा. पाण्याचा निचरा होण्यासाठी शोषखड्डुयाचा वापर करावा. घरासह सभोवतालची डासोत्पत्ती स्थाने नष्ट करा, गप्पी मासे पाळा, परिसर स्वच्छ ठेवा, साचलेल्या पाण्यावर रॉकेल किंवा खराब ऑईलचे थेंब टाका, सर्व पाण्याचे साठे झाकून बांधून ठेवा, आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा, निरुपयोगी विहिरीत व साचलेल्या पाण्यात डास टळी भक्षक गप्पी मासे सोडावेत. सायंकाळच्या वेळेस घराचे दारे खिडक्या बंद ठेवाव्यात व गोठयात पाला पाचोल्याचा धुर करावा. डुकरांना दूर ठेवावे, दररोज मच्छरदाणीचा वापर करा, संडासाच्या वेंट पाईपला जाळी अथवा कपडा बसवणे, नाल्या वाहत्या करणे इ.

किटकजन्य आजाराच्या नियंत्रणासाठी आठवडयातून शनिवार हा एक दिवस कोरडा दिवस म्हणून पाळावा. यादिवशी पाण्याची टाकी, रांजण, माठ, वॉटर कुलर, फ्रीजच्या मागील पाणी रिकामे करुन स्वच्छ पुसुन घ्यावे. छतावरील खड्डे, टायर, भंगार वस्तू, नारळाच्या करवंटया, प्लास्टिक वस्तू, कुंड्या खालची पेट्रीडिश, बादल्या, फ्रीजचे ट्रे, निरुपयोगी माठ स्वच्छ पुसून घ्यावेत. भांडयात पाणी साचू देऊ नये, झाडाच्या कुंड्या, प्राण्यांची पाणी पिण्याची भांडी यातील पाणी बदलत राहावे. वापराच्या पाण्याची भांडी झाकून ठेवावी. पाण्याच्या टाकीत गप्पी मासे सोडावेत. मच्छरदाणीचा वापर करावा. पूर्ण अंग झाकेल असे सैल कपडे वापरावेत. डास होवू नये म्हणून डास अळीची पैदास रोखण्यात यावी.

### नागरिकांनी आरोग्याची काळजी घ्यावी!

केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार जून महिना हा हिवताप प्रतिरोध महिना म्हणून पाळण्यात येतो. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये विविध प्रकारचे किटकजन्य आजार उद्भवण्याची शक्यता असते. आरोग्य विभागाने केलेल्या सूचनांचे पालन करुन नागरिकांनी पुरेशी दक्षता बाळगल्यास या आजारांवर वेळीच प्रतिबंध घालणे शक्य आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून आपल्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे.

**हिवताप अथवा संशयित डेंग्यू रुग्ण आढळल्यास जवळच्या महानगरपालिका रुग्णालयास त्वरीत माहिती द्यावी. रुग्ण संशोधन कार्यवाहीसाठी आपल्या घरी येणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांस तसेच फवारणी कामगारांना सहकार्य करावे.**
**-अभिजित बांगर,**
**आयुक्त, नवी मुंबई महापालिका**



# शिरवणेत पोलीस गस्ती पथक वाढविण्याची भाजपची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

शिरवणे गाव, नेरूळ सेक्टर १, जुईनगर परिसरातील वाढत्या चोरीच्या घटना, वाढत असलेले अनुचित प्रकार यामुळे नागरिकांमध्ये वाढलेली असुरक्षिता आदींबाबत नेरूळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक श्याम शिंदे यांची माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी भेट घेतली. भाजप प्रभाग ३२ मधील कार्यकर्त्यांसमवेत एक लेखी निवेदन देऊन पोलीस गस्त वाढवावी, तसेच पोलीस बिट चौकी विभागात उभारण्याची मागणी निवेदनाद्वारे या वेळी करण्यात आली.

निवेदनात शिरवणे नेरूळ सेक्टर१ आणि जुईनगर परिसरात वाढत्या चोरीच्या घटनेवर चिंता व्यक्त केली आहे. मागील १५ दिवसांपूर्वी शिरवणे टिम्बर मार्ट परिसरातील महाराष्ट्रभूषण स्वर्गीय नानासाहेब धर्माधिकारी बहुउद्देश्यीय इमारतमधील ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्रात चोरी झाली होती. या परिसरात सातत्याने लहान मोठ्या चोरीच्या घटना सतत घडत असतात. या वाढत्या चोरीच्या घटनांमुळे महिला, लहान मुले व जेष्ठ नागरिक यांच्या मध्ये भीतीचे वातावरण पसरले असून असल्याचे निवेदनात माधुरी सुतार यांनी नमूद केले आहे.

शिरवणे गाव व गावठाण परिसरात गर्दुल्ले, नशापान करणारे, टवाळखोर यांचे प्रमाण वाढले आहे. या घटकांपासून सार्वजनिक ठिकाणी टिंगलटवाळी, महिलांची आणि मुलांची छेडछाड करणे असे प्रकार घडत असतात. अशा असामाजिक तत्वापासून कोणत्याही प्रकारे अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिसरात पोलिस गस्त पथक वाढवावे जेणेकरून महिला व मुलींना रात्रीच्या वेळी घराबाहेर पडणे असुरक्षित वाटणार नाही. तसेच शिरवणे गावातील जूना ठाणे बेलापुर रोड, शिवाजी चौक, टिम्बर मार्ट परिसरात पोलीस बिट चौकी उभारावीत अशी मागणी निवेदनात केली आहे.

या वेळी माधुरी सुतार यांच्यासमवेत विजय भरत नाईक, संजय झनझणे, प्रभाकर ठाकूर, पांडुरंग सुतार, अनिता पाटील आदी उपस्थित होते.

**नवी मुंबई पोलीस आयुक्तातर्गत ११२ क्रमांकाचा हेल्पलाइन नंबरवर नागरिकांनी मदत मागितली की, तात्काळ मदत मिळते. नेरूळ पोलीस ठाणे अंतर्गत येणाऱ्या परिसरात चार बिट मार्शल तैनात आहे. एक स्वतंत्र पोलीस वाहन पेट्रोलियम करीत असते. यापुढे गस्ती पथक वाढवण्यात येईल. नव्याने बिट चौकी निर्माण करण्याचा निर्णय घेतला जाईल.**
**-श्याम शिंदे,**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नेरूळ पोलीस ठाणे**

## निवडक

### उसर्ली खुर्द येथून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक २३ वर्षीय तरुणी कोठे तरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. लता महादेव जाधव (रा. उसर्ली खुर्द) असे तिचे नाव असून रंग सावळा, नाक जाड, अंगाने सडपातळ, उंची पाच फूट दोन इंच आहे. या मुली बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस नाईक युवराज म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा.

### कोकण विभागात अल्प पावसाची नोंद

**नवी मुंबई :** कोकण विभागात मंगळवारी (दि. २१) सरासरी ३१.९ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद सिंधुदुर्ग जिल्ह्यात ४६.०मि.मी. झाली आहे. कोकण विभागात आत्तापर्यंत एकूण १६४.६ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. ठाणे-११.९ मि.मी., पालघर-४४.३मि.मी, रायगड-२३.० मि.मी., रत्नागिरी-३६.० मि.मी., सिंधुदुर्ग-४६.०मि.मी, अशी जिल्हानिहाय पावसाची आकडेवारी आहे.

# केक खरेदी महागात पडली; तब्बल ४८ हजारांना फटका



**पनवेल : वार्ताहर**

बायकोच्या वाढदिवसाच्या निमित्ताने मागवलेल्या केकच्या ऑर्डरचे क्रेडिट कार्डद्वारे पेमेंट केल्यास २० टक्के सूट मिळेल, असे आमिष दाखवून तब्बल ४८ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार कामोठे येथे घडला आहे. आरोपींविरुद्ध कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कामोठे सेक्टर ६ ए येथे राहणारे निशांतकुमार अनिलकुमार झा यांच्या पत्नीचा वाढदिवस असल्याने त्यांनी इंटरनेटवर सर्च करून मेरवान्स केक शॉप साइटवर जाऊन केकची ऑर्डर दिली. या वेळी क्रेडिट कार्डद्वारे पेमेंट केल्यास २० टक्के सूट मिळेल असे आमिष निशांतकुमार यांना दाखवण्यात आले. त्यांनी क्रेडिट कार्डद्वारे पेमेंट केले. त्यानंतर त्यांनी बिलिंग प्रोसेस व जुना डाटा डिलीट करण्यासाठी १० रुपये ऑनलाइन ट्रान्सफर करण्यास सांगून व क्रेडिट कार्डचा तपशील घेऊन निशांत कुमार यांची ४८ हजार रुपयांची फसवणूक केली. या वेळी त्यांना ऑर्डर केलेला केकसुद्धा मिळाला नाही.

# पारसिक हिलवरील सौंदर्यस्थळ वाचण्यासाठी पर्यावरणवादी सरसावले

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूरमधील पारसिक हिलच्या रहिवासी बाजूला रविवारी नवीन स्थळावर खानकामास सुरू झाली आहे. त्यामुळे दरड कोसळण्याचा धोका वाढला असल्याचे मत पारसिक हिलचे निवासी विष्णू जोशी यांनी व्यक्त केले. याविषयी पर्यावरण वाद्यांनी पालिकेकडे तक्रार केली आहे. नॅट कनेक्शन फाउंडेशनने नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त अभिजित बांगरकडे तक्रार केली असे सोबत ठाण्याचे प्रमुख वन संवर्धक एस. व्ही. रामा राव यांच्यासह मुख्यमंत्र्यांकडेदेखील तक्रार करण्यात आली आहे. पारसिक हिलसारखे सौंदर्यस्थळ वाचण्यासाठी पर्यावरणवादी सरसावले आहेत.



पारसिक हिलचा उतार कापण्याची ही दुसरी घटना असल्याचे नॅटकनेक्टचे संचालक बी. एन. कुमार म्हणाले. या आधीदेखील सायन पनवेल महामार्गलगतदेखील विकासकाकडून पारसिक हिल पोखरून सुशोभीकरण करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. याविषयी पर्यावरणवाद्यांनी मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केल्यावर या विषयी तक्रारींना वन विभागाकडे सुपूर्द केले होते. या राज्य सरकारच्या वेळकाढुपणाबाबत पर्यावरणवादी नाराजी व्यक्त करत असतानाच आता हे दुसरे प्रकरण पुढे आले आहे.

टेकडीवर होणाऱ्या या आघातांमुळे दरडी कोसळू शकतात, ज्याचा टेकडीच्या माथ्यावर असलेल्या इमारतींवर परिणाम होऊ शकतो अशी पारसिक हिल रहिवासी संघटनेने भीती व्यक्त केली आहे. हिलवर अंदाजे २०० भूखंड चिन्हांकीत करण्यात आले असून त्यापैकी जवळपास शंभर भूखंडावर बांधकामे करण्यात आली आहेत. एकीकडे डोळ्यादेखत उतारावर संपूर्ण वाढलेल्या झाडांना कापले आणि जाळले जात आहे. ही वृक्ष कत्तल थांबवण्याऐवजी नवी मुंबई महापालिकेतर्फे परसिक हीलच्या दुसऱ्या भागात हजारो रोपांचे वृक्षारोपण केले जात आहे. पालिकेने असलेली झाडे वाचववावीत अशी मागणी नात कनेक्त फाउंडेशनने केली असून; पारसिक हिल वाचवायला जनआंदोलन उभारणार असल्याचे फाउंडेशनचे कुमार यांनी सांगितले.

# भाजपकडून सीवूड्‌समध्ये हायमास्टची सुविधा



**नवी मुंबई : बातमीदार**

माजी नगरसेवक गणेश म्हात्रे यांच्या प्रयत्नाने सीवूडस सेक्टर ४४ आणि ४६ येथे विविध ठिकाणी हायमास्ट दिवे बसवण्यात आले असून आता हे परिसर प्रकाशाने उजळून निघाले आहेत.

सिस्ट ४६ ए मध्ये गेहलोत मॅजेस्टिक सोसायटीसमोर आणि सेक्टर ४४ ए केशवकुंज सोसायटीसमोर हायमास्ट दिवे बसवण्यात आले आहेत. या हायमास्टचे लोकार्पण माजी महापौर सागर नाईक यांच्या हस्ते माजी नगरसेवक विनोद म्हात्रे यांच्या उपस्थितीत झाले.

या वेळी सेवाधारी ज्येष्ठ नागरिक, तसेच आबा कांबळे, अशोक कुंडे, सीताराम रोकडे, राकेश तांडेल, अजित भोईर, सुरज पोटे, राम पवार, शांताराम खरे, आप्पा कुलकर्णी, सुधाकर डोरनाल, संतोषी म्हात्रे, शीतल म्हात्रे, ज्योती परदेशी, मीरा बिस्ट, ज्योती पाटील यासह नागरिक उपस्थित होते.




**उलवे नोड : रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सातत्याने विविध उपक्रम सुरू असतात. त्यानुसार मंगळवारी आंतरराष्ट्रीय योग दिवस कॉम्प्लेक्समध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. योग गुरू करुणा तावडे यांच्या वतीने कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या या योग दिनानिमित्तच्या कार्यक्रमात जवळपास ४१ जणांनी सहभाग घेतला.**

# रसायनीत भारतीय बौद्ध महासभेचा मेळावा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर भवनात भारतीय बौद्ध महासभेचा केंद्रीय शिक्षक शिक्षिका बौध्दाचार्य मेळावा संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड होत. तर सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस विजय कांबळे साहेब यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक महाराष्ट्राचे सरचिटणीस तथा रायगड जिल्हा पालकमंत्री सुशील वाघमारे, राष्ट्रीय कोषाध्यक्ष राजेश पवार तसेच महाराष्ट्राचे संरक्षण उपाध्यक्ष हिरवाळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम व्यवस्थित होण्यासाठी संस्कार उपाध्यक्ष राजेश भालेराव, सचिव बंडु कदम, संतोष जाधव, दीपक कांबळे तसेच पर्यटन उपाध्यक्ष गणेश कांबळे व संपूर्ण जिल्हा कमिटी यांनी फार मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा कोषाध्यक्ष उषा कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या मेळाव्यामध्ये पनवेल, पेण, कर्जत, खोपोली, खालापूर, उरण व अलिबाग या तालुक्यांमधून चांगल्या प्रकारे केंद्रीय शिक्षक शिक्षिका बौद्धाचार्य उपस्थित होते.

# दिघोडे येथे योग दिन उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मंगळवारी (दि. २१) दिघोडे विभागीय शिक्षण संस्थेचे महात्मा गांधी विद्यालय व स्वर्गीय रा. ना. ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय येथे योग दिन साजरा करण्यात आला.

या वेळी योग शिक्षक अनिल शेळके यांनी विद्यार्थ्यांना योगसाधनेची प्रात्यक्षिके करून दाखविले, तसेच पी. टी. शिक्षिका सौ. थळी यांनी योगसाधनेचे धडे सांगितले. शाळेचे मुख्याध्यापक एन. एन. नाईक, शिक्षक प्रतिनिधी डी. के. चव्हाण आणि सर्व शिक्षकवृंदाने योगासनाचा लाभ घेतला.





# नेरळमधील पथदिवे बंद

कर्जत : बातमीदार

वीज देयके थकीत असल्याने महावितरण कंपनीने नेरळ ग्रामपंचायतीच्या पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित केला आहे. त्यामुळे मागील पाच दिवसांपासून नेरळमधील रस्त्यावर अंधार आहे. शहरातील राजमाता जिजामाता तलाव आणि हुतात्मा चौकदेखील अंधारात आहे.

- रस्त्यांवर अंधाराचे साम्राज्य
- देयके थकीत असल्याने वीजपुरवठा खंडित

(छाया : संतोष पेरणे)

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील दहा वीज जोडण्यांच्या माध्यमातून पथदिव्यांना वीजपुरवठा केला जातो.

पुर्वी राज्य सरकारच्या ग्रामविकास विभागाकडून राज्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या पथदिव्यांची देयके महावितरणकडे भरली जात होती. मात्र जुलै २०२० पासून राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाने त्या त्या ग्रामपंचायतने पथदिव्यांची देयके भरावीत, असे आदेश काढले आहेत. आणि तेंव्हापासून ग्रामविकास विभागाने पथदिव्यांचे देयकाचे पैसे देण्याचे बंद केले आहे. त्याबद्दल रायगड जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी वारंवार आपल्या कैफियत मांडल्या होत्या होत्या. मात्र शासनाने त्याबाबत कोणताही निर्णय घेतला नसल्याने ग्रामपंचायतींची पथदिव्यांची देयके महावितरणकडे पोहचली नाही. नेरळ ग्रामपंचायत मागील काही महिन्यांचे ५० लाख रुपयांचे वीजबिल महावितरणला देणे आहे. त्यामुळे महावितरणने नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील सर्व पथदिव्यांच्या वीज जोडण्यांचा पुरवठा खंडित केला आहे. त्यामुळे मागील पाच दिवसांपासून नेरळ गावातील रस्त्यावर अंधार आहे.

**“ग्रामपंचायतीच्या पथदिव्यांची वीज देयके पूर्वीपासून शासनाचा ग्रामविकास विभाग भरीत होता. २०२०पासून रायगड जिल्हा परिषद पथदिव्यांची देयके भरणार आहे, मात्र ती न भरल्यामुळे नेरळ ग्रामपंचायतीच्या पथदिव्यांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. तत्पूर्वी महावितरणने ग्रामपंचायतीकडे चौकशी करायला हवी होती.**

**–गणेश गायकर, ग्रामविकास अधिकारी, नेरळ ग्रामपंचायत**

# नेरळजवळ टेम्पोची दुचाकीला धडक

## एकाचा मृत्यू, दुसरा जखमी



कर्जत : बातमीदार

कल्याण-कर्जत राज्यमार्गावरील जिते गावाजवळील वळणावर मंगळवारी (दि. २१) टेम्पोने दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीवरून प्रवास करणाऱ्या बदलापूर येथील तरुणाचा मृत्यू झाला.

बदलापूर येथील चार तरुण मंगळवारी सकाळी बदलापूर येथून दोन दुचाकीवर बसून कल्याण-कर्जत रस्त्याने खोपोली येथील इम्याजिका येथे पर्यटनासाठी निघाले होते. जिते येथील वळणावर कर्जतकडून भरधाव वेगात येणाऱ्या टेम्पोने डीव्हायडर तोडून एका दुचाकीला धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील राहुल यादव आणि गौरव लाड हे दोघे टेम्पोखाली दबले गेले. त्यात दुचाकीचालक राहुल यादव यांच्या पायाला गंभीर जखम झाली तर त्या दुचाकीवर मागे बसलेला गौरव लाड याचा जागीच मृत्यू झाला. जखमी राहुल यादव याला रायगड हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

अपघातानंतर टेम्पोचालक पळून जात असताना पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. या अपघाताची नोंद नेरळ पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# माणगावात क्रशरवर काम करणाऱ्या मजुराचा मृत्यू

माणगाव : प्रतिनिधी

माणगावात क्रशरवर काम करताना पाय घसरून पडल्याने अनिलकुमार अलीयार राम (वय ३०, मूळ रा. कोईनी, बिहार) या मजुराचा सोमवारी (दि. २०) सायंकाळी मृत्यू झाला.

अनिलकुमार हा मंगेश सुरेश पोळेकर यांच्या क्रशरवर काम करीत होता. सोमवारी संध्याकाळी काम करीत असताना पाय घसरून खाली पडल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. उपजिल्हा रुग्णालयात उपचार चालू असताना त्याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी करण्यात आली असून अधिक तपास सहाय्यक फौजदार भोजकर करीत आहेत.

# खोपोलीत भारतीय जनता पक्षाचा जल्लोष

खोपोली : प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषदेवर भारतीय जनता पक्षाचे पाच आमदार निवडून आल्याच्या पार्श्वभूमीवर खोपोली भाजपने मंगळवारी (दि. २१) फटाके वाजवून त्याचप्रमाणे मिठाईचे वाटप करून आनंद साजरा केला.

खोपोली शहरातील दीपक चौकात भाजप महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनीताई पाटील यांच्या उपस्थितीत झालेला हा कार्यक्रम भाजपचे शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल यांच्या नेतृत्वाखाली साजरा करण्यात आला. या वेळी भाजप खोपोली शहर कार्यकारिणीचे सर्व सदस्य, महिला मोर्चा तसेच युवा मोर्चाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# बालसुधारगृहातून पळून गेलेला मुलगा रेल्वे पोलिसांच्या ताब्यात

कर्जत : बातमीदार

शहरातील मार्केटयार्ड भागात असलेल्या बालसुधार गृहातील एक बालक सोमवारी (दि. २०) पळून गेला होता, मात्र मध्यरात्रीच्या सुमारास कर्जत रेल्वे पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन त्याची पुन्हा बालसुधार गृहात रवानगी केली.

कर्जत रेल्वे पोलीस ठाणे हद्दीतील राबरी पॉइंट येथे कर्तव्यावर असणारे होमगार्ड हिंदोळा आणि डाके यांना लक्ष्मण संतोष पवार (वय १५) हा मुलगा सोमवारी मध्यरात्री फिरताना दिसला. त्यांनी त्याला पोलीस ठाण्यात आणले. अधिक चौकशीत लक्ष्मण पवार हा बालसुधारगृहातून पळून आल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलीस नाईक कुलथे यांनी त्याला कर्जत पोलीस ठाण्यात नेऊन ठाणे अंमलदार सानप यांच्या ताब्यात दिले. आणि बालसुधारगृहाचे काळजीवाहक रमेश ठमके यांना बोलावून लक्ष्मण पवार ताब्यात दिले.



# माणुसकी प्रतिष्ठानकडून भैरवगडावर स्वच्छता मोहीम

अलिबाग : रामप्रहर वृत्त

माणुसकी प्रतिष्ठान जीतनगर या सामाजिक संस्थेतर्फे रविवारी (दि. १९) किल्ले भैरवगड येथे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या वेळी प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी गडाच्या पायथ्यापासून ते सुळक्यापर्यंत पडलेले प्लास्टिक गोळा करून ते पुनर्वापराकरिता दिले.

माणुसकी प्रतिष्ठानचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ. राजाराम हुलवान यांनी या वेळी वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनाबद्दल मार्गदर्शन केले. प्रतिष्ठानचे उरण शाखा अध्यक्ष स्वप्नील भोईर, आरोग्य विभाग सदस्य डॉ. मोनाली चासकर, अलिबाग शाखा महिला विभाग प्रमुख उज्वला चव्हाण, सह्याद्री रॉक ॲडव्हेंचर प्रमुख पवन पवार यांच्यासह संस्थेचे सदस्य या मोहिमेत सहभागी झाले होते.




# खालापुरात महाराजस्व अभियानांतर्गत दाखले शिबिर

खोपोली, खालापूर : प्रतिनिधी

खालापूर तहसील कार्यालयाने तालुक्यातील विविध मंडल विभागात महाराजस्व अभियान अंतर्गत शैक्षणिक व अन्य विविध स्वरूपांचे दाखले वाटप शिबिरांचे आयोजन केले आहे.

सर्वसामान्य जनतेस शैक्षणिक व अन्य कामाकरिता विविध स्वरूपाच्या दाखल्याची आवश्यकता असते. यासंबंधी विद्यार्थ्यांना लागणारी प्रमाणपत्रे सोयीच्या ठिकाणी विशेष शिबिर आयोजित करून देण्यात येणार आहेत. खालापूर तहसील कार्यालयामार्फत महाराजस्व अभियान अंतर्गत २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी लागणारे दाखले या शिबिरात देण्यात येणार आहेत.

तालुक्यातील चौक मंडल विभागात २२ जून रोजी चौक, २९ जून रोजी वासांबे आणि ६ जुलै रोजी टेंभरी आदिवासीवाडी येथे सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत दाखले वाटप शिबिर घेण्यात येणार आहेत. तर खोपोली मंडल विभागात खालापूर २३ जून, खोपोली ३०जून आणि नावंढे येथे ७ जुलै रोजी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

वावोशी मंडल विभागात २४ जून रोजी गोरठण आणि चिलथान येथे तर १जुलै आणि ८जुलै रोजी ग्रामपंचायत उंबरे येथे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या ठिकाणी संबंधित आवश्यक असणारे दाखले मिळण्यासाठी कागदपत्रासह अर्ज दाखल करता येणार असल्याची माहिती खालापूर तहसील कार्यालया तर्फे देण्यात आली.



(छाया : राज वैशंपायन)

# आमडोशीत दहावी, बारावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

नागोठणे : प्रतिनिधी

श्री. माऊली कृपा ध्यानधारणा केंद्राच्या वतीने शनिवारी (दि. १८) आमडोशी (ता. रोहा) येथील विठ्ठल मंदिरात दहावी व बारावी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा केंद्राचे संस्थापक तथा वारकरी परिषद जिल्हाध्यक्ष हभप मधुकर महाराज जवके यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

हभप गजानन महाराज बळकावडे, केंद्राचे सचिव भरत कामथे, खजिनदार रविंद्र जांभेकर, संघटक संजय कामथे, प्रविण जांबेकर, साधूराम कामथे, विठ्ठल जांभेकर, सिताराम टके, जनार्दन भोसले, आत्माराम जांभेकर यांच्यासह केंद्राचे पदाधिकारी, सदस्य आणि ग्रामस्थ या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चौकमध्ये करियर मार्गदर्शन शिबिर

चौक : रामप्रहर वृत्त

आधार चॅरिटेबल ट्रस्ट या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर देशमुख यांच्या सौजन्याने चौक येथील सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर शाळेत दहावी, बारावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी करियर मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. विद्या प्रसारिणी सभा या संस्थेच्या कार्याध्यक्षा शोभाताई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शिबिरात अस्मि फाउंडेशनचे अनिश कुलकर्णी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आधार चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवले जात आहेत. आयोजक प्रभाकर देशमुख यांनी प्रास्ताविकातून शिबिराचा हेतू स्पष्ट केला. शरद कुंभार यांनी प्रमुख वक्ते अनिश कुलकर्णी यांचा परिचय करुन दिला. कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत अडीच तास करिअरच्या वाटा कोणकोणत्या प्रकारचा आहेत, विविध प्रकारच्या शिष्यवृत्त्या कशाप्रकारे मिळवायच्या, कोणत्या प्रवेश परीक्षा द्याव्या लागतात, प्रवेशासाठी आपल्याकडे कोणती कागदपत्रे असायला हवीत, आपली आवड व क्षमता पाहूनच करिअरचा विचार करावा या बाबत मार्गदशरन केले. या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसनही केले.

शिबिराचे सूत्रसंचालन अनिल बडेकर यांनी केले. विद्या प्रसारिणी सभा संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाश देशमुख, सेक्रेटरी योगेंद्र शहा, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष श्याम साळवी, सुधीर ठोंबरे, शाळेचे मुख्याध्यापक बादशा भोमले, उपमुख्याध्यापिका कांता पुजारी, पर्यवेक्षक दिलीप मोळीक, तसेच संजय कोंडीलकर, ॲड. मिलिंद सुरावकर, मनोहर देशमुख, जितेंद्र देशमुख, संजय गायकवाड, सुभाष देशमुख, शरद बैलमारे, यशवंत भालेकर यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आधार चॅरिटेबल ट्रस्टचे सदस्य, पालक आणि विद्यार्थी या शिबिराला मोठ्या संख्येने उपस्थित होते. निखिलेश देशमुख यांनी आभार मानले.







# निसर्ग चक्रीवादळात नुकसान झालेल्या बागायतदारांकडून रोपांच्या पैशांची वसुली

अलिबाग : प्रतिनिधी

दोन वर्षांपूर्वी झालेल्या निसर्ग चक्रीवादळात नुकसान झालेल्या बागायतदारांना शासनाने नारळ व सुपारीची रोपे पुरवली होती. त्याचे पैसे न मिळाल्याने नर्सरी चालक आता ते पैसे बागायतदार शेतकऱ्यांकडून वसूल करीत आहेत.

दोन वर्षांपूर्वी जूनमध्ये झालेल्या निसर्ग चक्रीवादळामध्ये रायगड जिल्ह्यात प्रचंड हानी झाली होती. घरं, शेती, बागायती यासह सार्वजनिक मालमत्तेचे अपरिमित नुकसान झाले होते. त्यावेळी बागांमध्ये पुनर्लागवडीसाठी शासनाकडून विविध जातींची रोपेदेखील पुरवण्यात आली. शासकीय रोपवाटिकांमधील रोपे कमी पडल्यामुळे खाजगी नर्सरीकडून रोपांचा पुरवठा करण्यात आला होता. मात्र आता दोन वर्षानंतर या रोपांची किंमत बागायतदारांकडून वसूल केली जात आहे. ही रक्कम आपल्याला परत मिळेल असे शेतकऱ्यांना सांगितले जात आहे. परंतु शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत.



(संग्रहीत छायाचित्र)

या संदर्भात कृषी अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, शासकीय रोपवाटिकांमध्ये पुरेशी रोपे उपलब्ध नव्हती. त्यामुळे बागायतदारांना खासगी रोपवाटिकांमधून रोपे घेण्यास सांगण्यात आले होते. त्याचे पैसे शासन देणार होते. हे पैसे अद्याप सरकारकडून आलेले नाही. त्यासाठी आमचा पाठपुरावा सुरु आहे.

पुनरूज्जीवन आणि पुनर्लागवडीचे मिळून अलिबाग तालुक्यात जवळपास दोन कोटी रुपये सरकारकडून येणे बाकी आहे. किनारपट्टीवरील तीन तालुक्यांचा विचार केला तर ही रक्कम सहा कोटींच्यावर जाईल.

आम्ही कृषी विभागाच्या सुचनेनुसार रोपवाटिकांमधून रोपे घेतली मात्र त्याचे पैसे जमा झालेले नसल्याने कृषी विभागाने नर्सरीला पैसे अदा करण्याची सूचना केली होती. त्यानुसार पैसे दिले आहेत. मात्र शासनाकडून अजूनही आमच्या खात्यात पैसे जमा झालेले नाही, असे या वेळी बागायतदारांनी सांगितले.

# टीम इंडियाचे व्यस्त वेळापत्रक

## पुढील सहा महिने विविध मालिका खेळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गेल्या सहा महिन्यांमध्ये भारतीय क्रिकेट संघ कमालीचा व्यस्त राहिला आहे. विशेष म्हणजे पुढील सहा महिन्यांत म्हणजेच डिसेंबर २०२२पर्यंत टीम इंडियाचे वेळापत्रक प्रचंड व्यस्त असणार आहे.

या वर्षाच्या सुरुवातीपासून भारतीय क्रिकेटपटू सातत्याने क्रिकेट खेळण्यात व्यस्त आहेत. आंतरराष्ट्रीय सामन्यांव्यतिरिक्त २६ मार्च ते २९ मे या काळात जवळपास सर्वच भारतीय क्रिकेटपटू इंडियन प्रीमियर लीग स्पर्धेत खेळले. त्यानंतर काही वरिष्ठ खेळाडू वगळता इतर खेळाडू दक्षिण आफ्रिकेविरुद्ध पाच सामन्यांची टी-२० मालिका खेळले. ही मालिका नुकतीच संपली. त्याच्या दुसऱ्याच दिवशी पहाटे प्रशिक्षक राहुल द्रविड आणि श्रेयस अय्यर इंग्लंडला रवाना झाले आहेत.



आयर्लंड दौरा : येत्या एक-दोन दिवसांत भारताचा टी-२० संघ आयर्लंडला रवाना होणार आहे. तिथे भारताला २६ आणि २८ जून रोजी दोन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची मालिका खेळायची आहे.

इंग्लंड दौरा : आयर्लंडविरुद्धची मालिका संपल्यानंतर १ जुलैपासून इंग्लंडविरुद्ध एक कसोटी सामना खेळायचा आहे. हा सामना भारताने गेल्या वर्षी अर्धवट सोडलेल्या कसोटी मालिकेतील पाचवा आणि शेवटचा कसोटी सामना आहे. यानंतर इंग्लंडसोबतच भारत तीन एकदिवसीय आणि तीन टी-२० सामनेही खेळणार आहे. विराट कोहली, रोहित शर्मा, चेतेश्वर पुजारा, जसप्रीत बुमराह यांच्यासह कसोटी संघातील इतर काही खेळाडू यापूर्वीच इंग्लंडला पोहचले आहेत.

वेस्ट इंडिज दौरा : इंग्लंडनंतर भारताला वेस्ट इंडिज दौऱ्यावर जायचे आहे. २२ जुलैपासून तिथे पाच टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांची मालिका खेळली जाणार आहे. ७ ऑगस्टला ही मालिका संपेल. विशेष म्हणजे या मालिकेतील दोन सामने अमेरिकेतील फ्लोरिडा येथे होणार आहेत.

आशिया चषक : वेस्ट इंडिज दौऱ्यानंतर भारताला आशिया चषक खेळण्यासाठी श्रीलंकेला जावे लागणार आहे. आशिया चषकाचे वेळापत्रक अद्याप जाहीर झालेले नाही, तरी २७ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर या कालावधीमध्ये आशिया चषक होईल, अशी शक्यता आहे.

ऑस्ट्रेलियाचा संघ भारतात येणार : सप्टेंबर महिन्याच्या शेवटी ऑस्ट्रेलियाचा संघ भारतात येणार आहे. भारत तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या मालिकेसाठी ऑस्ट्रेलियाचे यजमानपद भूषवणार आहे.

टी-२० विश्वचषक : ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये ऑस्ट्रेलियामध्ये टी-२० विश्वचषक आयोजित केला गेला आहे. त्यासाठी भारताला ऑस्ट्रेलिया दौरा करावा लागणार आहे. १६ ऑक्टोबर ते १३ नोव्हेंबर या कालावधीमध्ये विश्वचषकाचे सामने होतील.

बांगलादेश दौऱ्यानंतर श्रीलंकेचा पाहुणचार : टी २० विश्वचषकानंतरही भारतीय संघाला सुटी मिळणार नाही. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये भारताला बांगलादेशमध्ये दोन कसोटी आणि तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेसाठी जावे लागणार आहे. वर्षाच्या शेवटी श्रीलंकेविरुद्ध एकदिवसीय मालिका खेळवण्याचा प्रस्ताव आहे. या मालिकेत पाच सामने खेळवले जाणार आहेत.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) नियोजन बघता येत्या सहा महिन्यांच्या काळात भारतीय क्रिकेट संघाला उसंत मिळणार नसल्याचे दिसते. या व्यस्त वेळापत्रकादरम्यान खेळाडूंसमोर आपली फिटनेट टिकवून ठेवण्याचे सर्वांत मोठे आव्हान असणार आहे.

# आजपासून रंगणार रणजी ट्रॉफी फायनल

## मुंबईचे ४२व्यांदा चॅम्पियन होण्याचे लक्ष्य

**मुंबई : प्रतिनिधी**

रणजी ट्रॉफी फायनलमध्ये मुंबईचं लक्ष्य आणखी एका ट्रॉफीवर आहे. मुंबईने आतापर्यंत सर्वाधिक ४१ वेळा रणजी ट्रॉफी जिंकली आहे. आता ४२व्यांदा रणजी चॅम्पियन होण्यासाठी मंगळवारी (दि. २२) पृथ्वी शॉच्या नेतृत्वात मध्य प्रदेशविरुद्ध मैदानात उतरणार आहे.

२२ जूनपासून बँगलोरमध्ये पाच दिवस रणजी ट्रॉफीची फायनल होणार आहे. या सामन्यात मुंबईची नजर कर्णधार पृथ्वी शॉ, सरफराज खान आणि अरमान जाफर यांच्यावर असेल. हे तिन्ही खेळाडू रिझवी स्कूलमध्ये एकत्र खेळले होते, त्यानंतर आता रणजी ट्रॉफीच्या फायनलमध्येही ते एकाच टीमकडून खेळताना दिसणार आहेत. २२ वर्षांच्या पृथ्वी शॉने याआधी २०१८ साली अंडर-१९ वर्ल्ड कपमध्ये भारताला चॅम्पियन बनवले होते, तसेच २०१९ साली मुंबई टी-२० लीग आणि २०२१ साली विजय हजारे ट्रॉफीमध्येही त्याने विजय मिळवला.

पृथ्वी शॉला रणजी ट्रॉफीच्या या मोसमात चांगली कामगिरी करता आलेली नाही. त्याने पाच सामन्यांच्या आठ इनिंगमध्ये ३३ च्या सरासरीने २६४ रन केले, यात तीन अर्धशतकांचा समावेश आहे. ७२ रन हा त्याचा सर्वोत्तम स्कोअर आहे. या दरम्यान त्याने ८६च्या स्ट्राईक रेटने बॅटिंग केली. रणजी ट्रॉफी फायनलचा सामना मध्य प्रदेशविरुद्ध मंगळवारी (दि. २२) होणार आहे.

# तृतीयपंथी जलतरणपटूंसाठी जागतिक संघटनेकडून नवे धोरण

**बुडापेस्ट : वृत्तसंस्था**

जागतिक जलतरण संस्थेने (फिना) तृतीयपंथी खेळाडूंसाठी नवे धोरण स्वीकारले असून याअंतर्गत वयाच्या १२व्या वर्षांपूर्वी संक्रमण केलेल्या जलतरणपटूंनाच महिलांच्या स्पर्धांमध्ये सहभाग घेण्याची परवानगी असेल.

'फिना'च्या सदस्यांनी रविवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत नव्या लिंग समावेश धोरणाच्या बाजूने मतदान केले. त्यामुळे सोमवारपासून सर्व स्पर्धांसाठी हा नियम लागू करण्यात आला आहे. एक नवीन गट स्थापन करण्यात येणार असून तो पुढील सहा महिने ही नवीन श्रेणी कशा पद्धतीने तयार करता येईल याबाबतचा आढावा घेईल, असे 'फिना'कडून सांगण्यात आले.

सायकलिंगच्या जागतिक संस्थेने तृतीयपंथी खेळाडूंसाठीचे नियम अधिक कठोर करताना पात्रता नियमांत बदल केले. त्यामुळे तृतीयपंथी सायकलपटूंना स्पर्धांमध्ये सहभागी होण्यापूर्वी अधिक काळ प्रतीक्षा करावी लागणार आहे. आंतरराष्ट्रीय सायकल संघटनेने (यूसीआय) टेस्टोस्टेरॉन या संप्रेरकाच्या किमान पातळीचा संक्रमणाचा काळ दोन वर्षांपर्यंत वाढवला असून कमाल स्वीकाहार्य पातळी कमी केली आहे. मागील संक्रमण कालावधी हा १२ महिन्यांचा होता, असे यूसीआयकडून सांगण्यात आले.

# विराटसंदर्भात 'ते' ट्वीट होतेय व्हायरल

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार विराट कोहलीच्या टेस्ट क्रिकेट कारकिर्दीला ११ वर्ष पूर्ण होत असताना सोशल मीडियावर मात्र एक ट्वीट सध्या जोरदार व्हायरल होत आहे. त्यामध्ये विराटला बाहेर काढण्याचे वक्तव्य केले आहे.

२०१२मध्ये कोहली कठीण टप्प्यातून जात होता. या सगळ्या दरम्यान माजी क्रिकेटपटू संजय मांजरेकर यांनीचे १० वर्ष जुने ट्वीट व्हायरल होत आहे.

# भारताच्या इंग्लंड दौऱ्यावर कोरोनाचे सावट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गेल्या वर्षी कोरोनामुळे अर्धवट सोडलेली कसोटी मालिका पूर्ण करण्यासाठी भारतीय संघ इंग्लंडला रवाना झाला आहे. १ ते ५ जुलै या काळात भारत आणि इंग्लंडदरम्यान एक कसोटी सामना खेळवला जाणार आहे. त्यापूर्वी २४ जूनपासून भारतीय संघ लिसेस्टरशायर येथे चार दिवसीय सराव सामना खेळणार आहे, मात्र त्यापूर्वीच भारतीय संघासाठी एक वाईट बातमी आली आहे. इंग्लंडमध्ये गेलेल्या कसोटी संघात रविचंद्रन अश्विन नजरेस पडला नाही. रविचंद्रन अश्विनला कोरोनाची लागण झाल्याची माहिती मिळत आहे.



इंग्लंडविरुद्धच्या एकमेव कसोटीसाठी बहुतेक खेळाडू इंग्लंडमध्ये पोहचले असून त्यांचा जोरदार सराव सुरू आहे. पण, कोविड-१९मुळे अनुभवी फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विन अजूनही भारतातच आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) एका सूत्राने पीटीआयला याबाबत माहिती दिली. सध्या अश्विन क्वारंटाईने आहे. त्याचा कोरोना अहवाल निगेटिव्ह आल्यानंतरच तो इंग्लंडला जाऊ शकेल.

सुत्रांनी असेही सांगितले की, कोरोनाची लागण झाल्यामुळे अश्विन लीसेस्टरशायरविरुद्धच्या सराव सामन्याला मुकण्याची शक्यता आहे. अश्विन व्यतिरिक्त उर्वरित संघ लंडनला पोहचला आहे. बीसीसीआयने भारतीय संघाच्या सरावाचे फोटो आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर पोस्ट केले आहेत.

# आंतरराष्ट्रीय सामन्यात पंच अचानक क्षेत्ररक्षकाच्या भूमिकेत

**पल्लेकेले : वृत्तसंस्था**

सध्या ऑस्ट्रेलियाचा क्रिकेट संघ श्रीलंकेच्या दौऱ्यावर आहे. दोन्ही देशांदरम्यान एक दिवसीय सामन्यांची मालिका खेळवली जात आहे. यजमान श्रीलंका सध्या जबरदस्त कामगिरी करीत असून त्यांनी पाहुण्यांना तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात पराभूत केले. या विजयासह लंकेने पाच सामन्यांच्या मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. हा तिसरा एक दिवसीय सामना सध्या एका वेगळ्याच कारणासाठी चर्चेत आला आहे. सामन्यादरम्यान पंच असलेले कुमार धर्मसेना अचानक क्रिकेटर मोडमध्ये गेल्याचे दिसले. धर्मसेनाचा हा



व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

श्रीलंका आणि ऑस्ट्रेलियाच्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात कुमार धर्मसेना पंच म्हणून मैदानात उभे होते. ऑस्ट्रेलियाच्या डावात यष्टीरक्षक ॲलेक्स कॅरी फलंदाजी करीत असताना त्याने स्क्वेअर लेगच्या दिशेने एक फटका मारला. नेमक्या त्याच बाजूला पंच कुमार धर्मसेना उभे होते. कधी काळी क्रिकेटर असलेले धर्मसेना आपण पंच असल्याचे विसरून गेले आणि त्यांनी चेंडू पकडण्यासाठी हात पुढे केले, पण त्यानंतर काही सेकंदातच त्यांना आपण पंच असल्याची जाणीव झाली आणि त्यांनी घाईघाईने हात मागे घेतले.

कुमार धर्मसेना यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. नेटिझन्सनी या व्हिडीओवर मजेशीर कमेंट केल्या आहेत. काहींनी तर एकदिवसीय विश्वचषकाच्या वेळी तयार झालेले धर्मसेना यांचे मीम पुन्हा कमेंट बॉक्समध्ये शेअर केले आहेत.

# फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डोच्या गाडीला अपघात

**स्पेन : वृत्तसंस्था**

जगप्रसिद्ध फुटबॉलपटू क्रिस्टियानो रोनाल्डो सतत काहीना काही कारणामुळे चर्चेत असतो. काही दिवसांपूर्वी तो बलात्काराच्या एका खटल्यामुळे चर्चेत होता. त्यानंतर आता रोनाल्डो पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. पोर्तुगालचा स्टार स्ट्रायकर असलेल्या क्रिस्टियानोच्या बुगाटी व्हेरॉन कारला अपघात झाला आहे. सोमवारी (दि. २०) सकाळी स्पेनमधील मेयोर्का शहरातील एका घराच्या फाटकाजवळ या गाडीला अपघात झाला.



रोनाल्डो सध्या आपल्या कुटुंबासह सुट्टीचा आनंद लुटत असून त्याने समुद्रमार्गे ही गाडी स्पेनला मागवली होती. अपघाताच्या वेळी रोनाल्डो किंवा त्याच्या कुटुंबातील कोणीही या गाडीमध्ये नव्हते. रोनाल्डोचा एक कर्मचारी ही गाडी चालवत होता. एका वळणावर त्याचे गाडीवरील नियंत्रण सुटले आणि अपघात झाला. अपघातात गाडीच्या पुढील भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून रोनाल्डोचा कर्मचारी मात्र सुरक्षित आहे.


# राष्ट्रकुल स्पर्धेसाठी पुरुष हॉकी संघाची घोषणा

## मनप्रीतकडे भारताचे नेतृत्व

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आगामी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेसाठी सोमवारी (दि. २०) भारताच्या १८ सदस्यीय वरिष्ठ पुरुष हॉकी संघाची घोषणा करण्यात आली. अनुभवी मध्यरक्षक मनप्रीत सिंगकडे या संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपवण्यात आली असून ड्रॅगफ्लिकर हरमनप्रीत सिंगची उपकर्णधारपदी निवड करण्यात आली आहे.

हॉकी इंडियाकडून बर्मिंगहॅम येथे होणाऱ्या स्पर्धेकरिता सर्वोत्तम खेळाडूंचा समावेश असलेला संघ निवडण्यात आला आहे. २८ जुलैपासून रंगणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारताचा इंग्लंड, कॅनडा, वेल्स आणि घाना यांच्यासह 'ब' गटात समावेश असेल. दोन वेळा रौप्यपदक विजेता भारतीय संघ ३१ जुलैला घानाविरुद्ध सलामीचा सामना खेळेल.



**संघ** : गोलरक्षक- पीआर श्रीजेश, कृष्ण बहादूर पाठक, बचावपटू- वरुण कुमार, सुरेंदर कुमार, हरमनप्रीत सिंग (उपकर्णधार), अमित रोहिदास, जुगराज सिंग, जर्मनप्रीत सिंग, मध्यरक्षक- मनप्रीत सिंग (कर्णधार), हार्दिक सिंग, विवेक सागर प्रसाद, शमशेर सिंग, आकाशदीप सिंग, निलाकांत शर्मा, आघाडीपटू- मनदीप सिंग, गुरजंत सिंग, ललित कुमार उपाध्याय, अभिषेक.

# क्रिकेटपटू केएल राहुल उपचारासाठी जर्मनीत दाखल



**जर्मनी : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा फलंदाज केएल राहुल उपचारासाठी जर्मनीला पोहचला आहे. राहुल दुखापतीमुळे इंग्लंडविरुद्धच्या आगामी मालिकेत खेळू शकणार नाही.

इंग्लंड दौऱ्यासाठी केएल राहुलला टीम इंडियाचा उपकर्णधार बनवण्यात आले होते, मात्र आता त्याच्या जागी ऋषभ पंत जबाबदारी स्वीकारणार आहे. राहुल दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या टी-२० मालिकेतही कर्णधारपद भूषवणार होता, पण मालिका सुरू होण्यापूर्वी दोन दुखापतींमुळे तो बाहेर पडला होता. राहुल आता उपचारासाठी जर्मनीला गेला आहे. राहुलने त्याच्या सोशल मीडियाच्या अधिकृत इन्स्टाग्राम पेजवर ही माहिती दिली. ३० वर्षीय केएल राहुलचा फोटो सोशल मीडियावर अपलोड केल्यानंतर चाहते त्याच्या लवकरात लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करीत आहेत. आयपीएलच्या १५व्या हंगामामध्ये त्याला उजव्या हाताला दुखापत झाली होती, परंतु तेव्हा हे प्रकरण इतके गंभीर झाले नव्हते. तो कर्णधार म्हणून आयपीएल २०२२मध्ये लखनौ सुपर जायंट्सकडून खेळत राहिला. केएल राहुल जवळपास एक महिना जर्मनीमध्ये राहणार आहे. तो आता भारताच्या आगामी वेस्ट इंडिज दौऱ्यासाठी संघात निवडीसाठी उपलब्ध होऊ शकतो. बीसीसीआयने यापूर्वीच जर्मनीतील उपचारांची माहिती दिली होती.

# भारतीय वंशाच्या लिसाची एफआयसीए अध्यक्षपदी निवड

**ऑस्ट्रेलिया : वृत्तसंस्था**

फुटबॉलनंतर क्रिकेट हा जगातील दुसरा सर्वात लोकप्रिय खेळ आहे. क्रिकेट हा मुलांचा खेळ आहे, असे म्हटले जायचे, मात्र आयलियन ॲश, शार्लोत एडवर्ड, मिताली राज, सारा टेलर, लिसा स्थळेकर, अंजुम चोप्रा, बेट्टी विल्सन यांसारख्या महिला क्रिकेटपटूंनीदेखील तितक्याच ताकदीने क्रिकेट खेळू शकतात, हे सिद्ध करून दाखवले आहे. यांच्यापैकी भारतीय वंशाची ऑस्ट्रेलियन महिला क्रिकेटपटू लिसा स्थळेकरने फेडरेशन ऑफ इंटरनॅशनल क्रिकेटर्स असोसिएशनच्या (एफआयसीए) अध्यक्षपदी विराजमान होण्याची कमाल करून दाखवली आहे.

लिसा ही एफआयसीए पहिली महिला अध्यक्ष ठरली आहे. स्वित्झर्लंडमधील नियॉन येथे झालेल्या एफआयसीए कार्यकारी समितीच्या बैठकीत ४२ वर्षीय लिसाच्या अध्यक्षपदावर शिक्कामोर्तब झाले. लिसापूर्वी दक्षिण आफ्रिकेचा माजी फलंदाज बॅरी रिचर्ड्स, वेस्ट इंडिजचा



माजी अष्टपैलू जिमी ॲडम्स आणि इंग्लंडचा माजी फलंदाज विक्रम सोळंकी यांनी हे पद भूषवले आहे.

ऑस्ट्रेलियाची माजी कर्णधार असलेली लिसा स्थळेकर भारतीय वंशाची आहे. तिचा जन्म पुण्यात झालेला आहे. लिसाने ऑस्ट्रेलियासाठी क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांमध्ये १८७ आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. एकदिवसीय क्रिकेटमध्ये तिने सर्वोत्तम कामगिरी केलेली आहे.

# बंगळुरूत स्टेडियमच्या गळतीमुळे चाहते नाराज

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाचवा आणि शेवटचा टी २० सामना पावसामुळे पूर्ण होऊ शकला नाही. पाऊस सुरू झाल्यानंतर स्टेडियमच्या छतावरून पाणी गळण्यास सुरुवात झाली. त्यामुळे प्रेक्षकांनी संताप व्यक्त केला.

सामन्यादरम्यान बंगळुरूमध्ये मुसळधार पाऊस झाला, त्याचवेळी स्टेडियमच्या छतावरून पाणी गळत होते. याबद्दल सोशल मीडियावर संताप व्यक्त करीत आहेत. एका चाहत्याने स्टेडियमच्या छतावरून पाणी गळतानाचा व्हिडिओ शेअर केला आहे. फॅनने हा व्हिडीओ बीसीसीआय आणि केएससीएला टॅग केला आहे. स्टेडियम सुधारणार कधी असेही विचारले.

# रद्द सामन्याच्या तिकिटाची ५० टक्के रक्कम परत मिळणार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पाचवा आणि अंतिम टी-२० आंतरराष्ट्रीय सामना बंगळुरू येथील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला गेला. शेवटच्या टी-२० सामना पावसामुळे वाहून गेल्यानंतर प्रेक्षकांना त्यांच्या तिकिटाचे पैसे परत केले जाणार असल्याची घोषणा कर्नाटक राज्य क्रिकेट असोसिएशनने केले आहे.

नाणेफेकीनंतर खेळाडू मैदानावर पोहचताच पावसाला सुरुवात झाली आणि त्यानंतर सामना १९-१९ षटकांचा करण्यात आला, मात्र त्यानंतर पुन्हा पाऊस सुरू झाला आणि अखेर सामना रद्द करण्यात आला. सामन्यादरम्यान सतत पाऊस पडत होता आणि त्यामुळे शेवटचा हा निर्णायक सामना पावसामुळे रद्द केला आहे. सामन्यात एकही चेंडू टाकल्यास तिकिटाचे पैसे परत केले जात नाही, असे केएससीएचे धोरण आहे. क्रिकेट असोसिएशनने प्रेक्षकांच्या तिकिटांचे पैसे परत करण्याचा निर्णय घेतला आहे.

युनियनने म्हटले आहे की, दर्शकांचे संपूर्ण पैसे परत केले जाणार नाहीत, परंतु ५० टक्के दिले जाणार आहे. केएससीएचे खजिनदार आणि प्रवक्ते विनय मृत्यूंजय म्हणाले, अटी आणि शर्तीनुसार, एकही चेंडू टाकला तरी तिकिटांचे पैसे परत मिळत नाही, मात्र केएससीएने तिकिटाच्या रकमेपैकी ५० टक्के रक्कम क्रिकेट चाहत्यांना परत करण्याचा निर्णय घेतला आहे.

हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., ॲट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, ॲस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**